cmyk

## संपादकीय

### निपूण लोकशाहीसाठी मतदानाची ताकद ओळखा

जनतेला आता राजकारण्यांची, नेत्यांची कमाल वाटायला लागली असेल. चेहऱ्यावर सोयीनुसार वेगवेगळे मुखवटे चढवायचे. तोच खरा चेहरा असल्याचे भासवायचे. गरज पडली तर मुखवट्याचे रंगही बदलायचे. शत्रूला मित्र म्हणून जवळ करायचे. मित्राची गणना शत्रू म्हणून करायची. स्वार्थासाठी त्यांचीही सरमिसळ करायची.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२५२ | शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### निसर्गपुत्र डॉ. माधव गाडगीळ यांचे निधन

पुणे: भारताचे ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ आणि 'पश्चिम घाट बचाव' मोहिमेचे प्रणेते डॉ. माधव गाडगीळ यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. पश्चिम घाट संवर्धन समितीच्या ऐतिहासिक अहवालाद्वारे त्यांनी विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्षावर शास्त्रीय भाष्य केले होते. पद्मश्री, पद्मभूषण, शांती स्वरूप भटनागर, संयुक्त राष्ट्रांच्या 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' यांसह अनेक पुरस्काराने सन्मानित डॉ. गाडगीळ यांनी लोकसहभागातून निसर्ग संवर्धनाचा विचार आयुष्यभर रुजवला. मधील त्यांचे संशोधन आणि पंतप्रधानांचे सल्लागार समीतीचे सदस्य म्हणून त्यांचे कार्य मैलाचा दगड ठरले. त्यांच्या निधनाने वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक भान जपणारा एक प्रखर प्रहरी हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### भीती ओळखूनच कुत्रे हल्ला करतात-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली: देशातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या त्रासावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संजय मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी झाली. कुत्रे माणसांमधील भीती ओळखू शकतात आणि त्याच भीतीमुळे ते हल्ला करतात किंवा चावा घेतात, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नाथ यांनी नोंदवले. गुरूवारी सलग दुसऱ्या दिवशी अडीच तास सुनावणी पार पडली. यानंर न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी स्पष्ट केले की, न्यायालय शुक्रवारी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी करेल. यावेळी प्राणी कल्याण संस्थांच्यावतीने युक्तिवाद करणाऱ्या एका वकिलांनी न्यायमूर्तींच्या या निरीक्षणाशी असहमती दर्शवली. त्यावर न्यायमूर्तींनी स्पष्ट शब्दांत सुनावले की, नकारार्थी मान हलवू नका, मी हे माझ्या वैयक्तिक अनुभवावरून बोलत आहे, असे न्यायमूर्ती नाथ यानी सुनावले.

### बांगलादेशची सुमारे २ लाख टन डिझेलची मागणी

ढाका: हिंदूंवर होणारे हल्ल्यामुळे भारत आणि बांगलादेशमधील संबंध गेल्या काही काळापासून बिघडले आहेत. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वातील कट्टरतावादी बांगलादेश सरकार पाकिस्तानच्या बाजूने झुकत आहे. एकीकडे ते भारतावर टीका-टिप्पणी करत आहेत, तर दुसरीकडे भारताकडूनच मदत मागत आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने २०२६ या वर्षात भारताकडून १ लाख ८० हजार टन डिझेल आयात करणार आहे. हे डिझेल भारतातील सरकारी कंपनी नुमालीगड रिफायनरी लिमिटेड (एनआरएल) कडून खरेदी केले जाईल. जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत डिझेल आयात करण्याचा हा निर्णय बांगलादेश सरकारच्या खरेदीविषयक सल्लागार समितीने मंजूर केला आहे. सचिवालयात झालेल्या बैठकीत वित्त सल्लागार सालेहुद्दीन अहमद यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला.

### तृणमूलच्या आयटी विभागावर ईडीची रेड

कोलकाता: पश्चिम बंगालच्या राजकारणात गुरूवारी पुन्हा एकदा केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. गुरुवारी सकाळी अंमलबजावणी संचालनालयाने निवडणूक रणनीतीकार संस्था आयपीएसीचे प्रमुख प्रतीक जैन यांच्या कोलकात्यातील निवासस्थानासह देशभरातील १५ ठिकाणांवर छापेमारी केली. या कारवाईची बातमी समजताच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी संताप व्यक्त करत थेट छापेमारी सुरू असलेल्या ठिकाणी पोहोचल्या आणि आयटी ऑफिसमधील अनेक फाईल घेऊन आपल्या गाडीत ठेवल्या आहेत. माध्यमांशी बोलताना ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारवर लोकशाही चिरडल्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या केंद्र सरकार तपास यंत्रणांचा वापर करून विरोधकांना डरावण्याचा प्रयत्न करत आहे. हा लोकशाहीचा गळा आवळण्याचा प्रकार आहे. केंद्रीय गृहमंत्रालय आणि तपास यंत्रणा देशाप्रति आपली जबाबदारी विसरल्या आहेत.

# शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार !

## हमीभाव, कर्जमुक्ती, बियाणे विधेयकाविरोधात फेब्रुवारीपासून देशव्यापी आंदोलन यात्रा; शेतकरी नेते डल्लेवाल यांची घोषणा

दिल्ली । वृत्तसंस्था

**संयुक्त किसान मोर्चा बिगर-राजकीयने पुन्हा एकदा केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांविरोधात एल्गार पुकारला आहे. शेतकरी नेते जगजीत सिंग डल्लेवाल यांनी गुरुवारी (दि.८) फेब्रुवारीपासून देशव्यापी आंदोलन यात्रा सुरु करण्याची घोषणा केली आहे. दिल्लीमध्ये डल्लेवाल यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी आंदोलन यात्रेबद्दल माध्यमांना माहिती दिली. तसेच शेतकरी विरोधी धोरणांवरून केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले.**

शेतमालाला किमान आधारभूत किंमत अर्थात हमीभावाला कायदेशीर हमी, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेती डब्ल्यूटीओतून वगळण्याची मागणी डल्लेवाल यांनी केली आहे. तसेच प्रस्तावित बियाणे विधेयक २०२५ विरोधात आंदोलनाची हाक दिली आहे. डल्लेवाल यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, केंद्र सरकार आणि कृषिमंत्री शेतकऱ्यांशी संवाद टाळत राहिले. शेतकरी आंदोलनाच्या काळात सात



### कन्याकुमारी येथून यात्रेला सुरूवात

पत्रकार परिषदेत डल्लेवाल यांनी आंदोलनाचा सविस्तर आराखडा प्रसिद्ध केला. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कन्याकुमारी येथून शेतकरी यात्रा सुरू होईल आणि मार्च महिन्यापर्यंत चालेल. या काळात देशभरातील १ लाखांहून अधिक गावांमध्ये पंचायत ठराव संमत करून घेतले जातील. या ठरावांद्वारे हमीभावाला कायदेशीर हमी देण्याची मागणी करण्यात येणार आहे. ही यात्रा १९ मार्च रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर भव्य रॅलीने समाप्त होणार असून, त्यानंतर हे सर्व ठराव पंतप्रधानांना सादर केले जाणार आहेत.

फेऱ्यांपर्यंत चर्चा झाल्यानंतरही, आठव्या फेरीची बैठक जाणीवपूर्वक टाळण्यात आली. तसेच ऑगस्ट २०२५ मध्ये दहा दिवसांत बैठक घेण्याचे लेखी आश्वासन देऊनही सरकारने ते पाळले नाही, असा आरोप त्यांनी केला. केंद्र सरकार आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात बियाणे विधेयक २०२५ संसदेत सादर करणार आहे. या विधेयकातील तरतुदीमुळे भारतीय शेतकरी विदेशी ▶▶ पान २ वर

राज्य सरकारचा निर्णय

## शेत आणि पाणंद रस्ते योजनेच्या समितीत पाच प्रगतशील शेतकऱ्यांचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावी अंमलबजावणीसाठी नवीन आदेश जारी केले आहेत. आता राज्य सरकारने विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीत सहअध्यक्ष आणि पाच प्रगतशील शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतातून शेतीमालाची वाहतूक करण्यासाठी चांगले रस्ते आवश्यक आहेत. त्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्रत्येक विधानसभा




क्षेत्रस्तरावर समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत सहअध्यक्ष नियुक्त करण्यात येणार असून, त्याची निवड करण्याचे अधिकार महसूल मंत्र्यांना देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीत पाच प्रगतशील शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. तर उपविभागीय अधिकारी हे जिल्हा ▶▶ पान २ वर

## पुराव्याच्या देवाणघेवाणीवरून न्यायालयात खडाजंगी

### स्व.देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या या बहुचर्चित प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. या हत्याकांड प्रकरणी गुरुवारी (८ जानेवारी) बीड येथील विशेष मकोका कोर्टात झाली. या सुनावणीत पुराव्यांची देवाणघेवाण, आरोपींचे अर्ज आणि तांत्रिक कागदपत्रांवरून जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. या प्रकरणाची पुढील



सुनावणी आता २३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

या प्रकरणातील महत्त्वाचे डिजिटल पुरावे असलेले पेन ड्राईव्ह सर्व आरोपींना उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश कोर्टाने दिले आहेत. पुराव्यांच्या पारदर्शकतेसाठी ही मागणी आरोपी पक्षाकडून करण्यात आली होती. त्यावर कोर्टाने आरोपींना पेन ड्राईव्ह देण्याचे

#### आरोपींकडून वकील बदलण्याची मागणी

या खटल्यातील काही आरोपींनी आपले वकील बदलण्याची मागणी केली आहे. यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी आपले लेखी म्हणणे सादर करावे, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत.

#### विष्णू चाटे याचा जेल बदलण्याचा अर्ज

या प्रकरणातील एक प्रमुख आरोपी विष्णू चाटे याने आपले कारागृह बदलून मिळावे, यासाठी कोर्टाकडे अर्ज केला आहे. त्याच्या वकिलांमार्फतही यासंदर्भात विनंती करण्यात आली असून, सुरक्षेच्या किंवा इतर कारणास्तव हा बदल मागितल्याचे समजते.

निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर लॉपटॉपची क्लोन कॉपी आणि तपासी अधिकाऱ्यांचे म्हणणे आरोपी पक्षाने पुराव्याचा भाग म्हणून लॉपटॉपची क्लोन कॉपी मिळावी, ▶▶ पान २ वर

## काँग्रेसच्या त्या १२ नगरसेवकांचा थेट भाजपमध्ये प्रवेश

### काँग्रेसची कठोर भुमिका, नगरसेवकांची धडधड वाढली

ठाणे । प्रतिनिधी

अंबरनाथ नगरपालिकेतील सत्ता स्थापनेदरम्यान भाजप आणि काँग्रेस नगरसेवकांमध्ये झालेल्या युतीमुळे काँग्रेस पक्षात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर भाजपसोबत हातमिळवणी करणाऱ्या काँग्रेस नगरसेवकांवर कारवाईचा इशारा देण्यात आल्यानंतर, संबंधित १२ नगरसेवकांनी थेट भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या घटनेमुळे काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून पक्षाने या प्रकरणात कठोर



भूमिका घेतली आहे.

अंबरनाथ नगरपालिकेत शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजप - काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अशी आघाडी आकाराला आली होती. मात्र, राज्य व देशपातळीवर परस्परविरोधी विचारधारा असलेल्या काँग्रेस आणि भाजपमधील युतीमुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. युतीवर टीका वाढताच काँग्रेस नेतृत्वाने आक्रमक भूमिका स्वीकारत संबंधित नगरसेवकांवर कारवाई करण्याचे संकेत दिले. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षातील अस्वस्थता अधिकच वाढली आहे. या प्रकाराला काँग्रेसने बेकायदेशीर आणि असंवैधानिक ठरवत, संबंधित नगरसेवकांचे ▶▶ पान २ वर

## जनगणना २०२७ चा पहिला टप्पा १ एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय गृह मंत्रालयाने सांगितले की, देशात होणाऱ्या २०२७ च्या जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान पार पडेल. याची सुरुवात घरांची यादी तयार करणे आणि घरांचा डेटा गोळा करण्यापासून होईल. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेश त्यांच्या येथे ३० दिवसांत हे काम पूर्ण करतील.

एमएचएने अधिसूचना जारी करून सांगितले की, १ एप्रिलपासून देशभरातील सर्व घरे आणि कुटुंबांची यादी तयार केली जाईल. तसेच, कुटुंबांची इतर माहितीदेखील गोळा केली जाईल, जेणेकरून लोकसंख्या मोजण्याची मजबूत तयारी करता येईल. सरकारने असेही म्हटले आहे की, घरांची यादी तयार करण्यास सुरुवात होण्यापूर्वी १५ दिवस लोकांना स्वत: माहिती भरण्याचा (सेल्फ एन्यूमरेशन) पर्याय देखील दिला जाईल. वास्तविक पाहता, जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोरोना महामारीमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती, जी आता २०२७ मध्ये पूर्ण होईल. सरकारने सांगितले की, यावेळी जनगणना पूर्णपणे डिजिटल असेल. सुमारे ३० लाख कर्मचारी मोबाइल ॲपद्वारे माहिती ▶▶ पान २ वर

## लाडकी बहीण योजनेत फसवणूक ६ महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई

बुलढाणा । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्या ६ महिला कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. शासकीय सेवेत असूनही उत्पन्नाची चुकीची माहिती देऊन या कर्मचाऱ्यांनी लाभ लाटला होता. तपासणीअंती या ६ महिलांकडून आतापर्यंत मिळालेली प्रत्येकी १६,५०० रुपये याप्रमाणे एकूण ९९,००० रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित १९० अर्धवेळ कर्मचाऱ्यांचे उत्पन्न मर्यादेत असल्याने त्यांना पात्र ठरवण्यात आले. मात्र, शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी या सहा कर्मचाऱ्यांवर ▶▶ पान २ वर

## राऊत-शिंदे यांच्या भेटीनंतर राजकीय वादळ

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने सध्या शिंदेसेना विरुद्ध ठाकरे सेना असा टोकाचा संघर्ष सुरू असतानाच, राजकारणाच्या या रणधुमाळीत एक अत्यंत अनपेक्षित घटना घडली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरेसेनेचे खासदार संजय राऊत हे एकमेकांसमोर आले. दोन्ही नेत्यांनी एकमेकांची यावेळी भेट घेतली. या दोन्ही कट्टर राजकीय



शत्रूंच्या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.८ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४०.५० क्विंटल | २,३०० | ३,११० | २,६९७ |
| ज्वारी/हायब्रिड :१०४.०० क्विंटल | २,२२० | ३,५०० | २,९३३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६५.५० क्विंटल | ६,०५२ | ७,०६२ | ६,८२६ |
| उडीद :२.०० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| बाजरी: ८३.०० क्विंटल | २,०५१ | ३,३७० | २,८८५ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: १०३.५० क्विंटल | ४,८६१ | ४,९०० | ४,८८७ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,०९० | ५,०९० | ५,०९० |

# शासन आदेश: टप्पा अनुदानाची राज्यभर होणार चौकशी!

## बीडची चौकशी जालन्यातील अधिकाऱ्यांकडून: चौकशीचे भूत संस्था चालक शिक्षकांच्या मानगुटीवर

मुंबई - बीड । प्रतिनिधी

राज्यातील खासगी प्राथमिक - माध्यमिक शाळा, मुन्ना तुकडी वाढ आणि २०, ४०, ६० आणि ८० टक्के टप्पा अनुदान दिले गेले, अशा राज्यातील ३६ जिल्हे आणि एका उपनगरातील माध्यमिक व प्राथमिक शाळांची चौकशी करण्याचे निर्देश राज्य शासनाने एका आदेशाद्वारे काढले असून, शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले गेले असल्याने चौकशीचे हे भूत संस्था चालक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानगुटीवर बसले आहे. बीड जिल्ह्यातील शाळांची तपासणी आणि चौकशी जालना जिल्ह्यातील अधिकारी करणार आहेत.

राज्यातील मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, बीड, लातूर या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक भरती घोटाळा झाला आहे. शालार्थ आयडी यु-डायस क्रमांक यांसह अनेकांनी याचा गैरवापर केला असून, कोणतीही परवानगी नसताना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली गेली. शासनाने २००१ मध्येच ही प्रक्रिया बंद केलेली असताना मागील कागदपत्रे दाखवून संस्थाचालकांनी लाखो रुपये घेत भरती केल्याचा ▶▶ पान २ वर



### नागपूर विभागात ६३२ शिक्षक दोषी

शालार्थ आयडी, यु-डायस क्रमांक कोणतीही परवानगी न घेता केलेल्या भरती संदर्भात पथकाने केलेल्या एका चौकशीमध्ये नागपूर विभागात ६३२ शिक्षक दोषी आढळले आहेत. शालार्थ आयडी बनावट असल्याचेही निदर्शनास आले असल्याचे राज्याचे माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक महेश पालकर यांनी म्हटले आहे.

cmyk

## अग्रलेख

# निपूण लोकशाहीसाठी मतदानाची ताकद ओळखा

जनतेला आता राजकारण्यांची, नेत्यांची कमाल वाटायला लागली असेल. चेहऱ्यावर सोयीनुसार वेगवेगळे मुखवटे चढवायचे. तोच खरा चेहरा असल्याचे भासवायचे. गरज पडली तर मुखवट्याचे रंगही बदलायचे. शत्रूला मित्र म्हणून जवळ करायचे. मित्राची गणना शत्रू म्हणून करायची. स्वार्थासाठी त्यांचीही सरमिसळ करायची. सरड्यासारखे रंग बदलायचे आणि त्याचे समर्थन देखील करायचे. खोटेच रेटून बोलायचे की ते खरेच वाटले पाहिजे आणि या सगळ्या गदारोळात स्वतःचा खरा चेहरा कायम राखायचा. सामान्य माणसे बिचारी एकाच चेहऱ्याने जगतात तरी त्यांना त्यांचे जगणे अवघड वाटते.

पक्ष आणि त्यांचे नेते एकाच वेळी असंख्य चेहऱ्यांनी वावरतात आणि तरीही त्यांचा कधीही गोंधळ उडत नाही. काल ज्याची स्तुती केली, त्याच्या नावाने दुसऱ्या दिवशी खडे फोडतानाही चेहऱ्यावरचे लबाड हसू विरत नाही. आणि सगळेच राजकारणी राजकीय नीतिमत्ता, साधनशुचिता, पक्ष विचारधारा आणि पक्षनिष्ठेचे डोस कार्यकर्ते आणि जनतेला पाजतात. हे काम सोपे अजिबात नाही. म्हणूनच नेते बनणे हे काम नोहे येरागबाळाचे, असे म्हणतात ते उगाच नव्हे. राज्यात महानगरपालिकांच्याच नव्हे तर सगळ्याच निवडणुकांसाठी हे वर्णन चपखल लागू होऊ शकेल. एक सत्ताधारी पक्ष आणि बाकी सगळे विरोधी पक्ष अशी परिस्थिती आता अभावानेच आढळताना दिसत आहे. निवडणुकीत एकूण पक्ष किती, सत्ताधारी पक्ष किती, विरोधी पक्ष किती, कोणत्या पक्षाची कोणाबरोबर युती आहे हे नेते देखील कदाचित ठामपणे सांगू शकणार नाहीत. त्यामुळे मतदार भांबावले असतील किंवा त्यांचा आवडता आणि नावडता पक्ष कोणता हेच त्यांना कळेनासे झाले असेल तर त्यात नवल नाही. तथापि, मतदारांनाच शहाणे व्हावे लागणार आहे. सरकार निवडण्याची आणि लोकशाही बळकट करण्याची जबाबदारी घटनेने त्यांच्यावर का सोपवली याचे किमान ज्ञान त्यांना असणे किंवा त्यांनी ते माहित करून घेणे गरजेचे होत चालले आहे. कारण मतदारांना गृहीत धरून राजकारण म्हणजे खिचडी होत चालले आहे. मतदानाच्या दिवशी सकाळी मतदान करून कर्तव्य पार पाडणे आता पुरेसे ठरणार नाही. सुजाण नागरिक म्हणून त्यांनी देखील राजकारणाचा आणि राजकीय घडामोडींचा अभ्यास करून स्वतःचे मत ठरवावे हीच जाणत्यांची अपेक्षा असणार.

राजकारणातले काही कळत नाही असा जनतेचा समज राजकारण्यांच्या पथ्यावर पडतो हे लोकांनी आता लक्षात घ्यायला हवे. युवा पिढीला निवडणूक प्रक्रियेत रस वाटत नसेल तर त्यापरते लोकशाहीचे दुसरे दुर्भाग्य कोणते असू शकेल? तरुण मतदारांची संख्या वाढत आहे. तरुण मतदार नाराज का आहेत, त्यांना मतदान करावेसे का वाटत नाही याचा विचार जसा राजकीय पक्षांनी करायला हवा, तसाच तो युवांनी पण करायला हवा. मतदान न करणे, प्रक्रियेत स्वारस्य न दाखवणे ही पळवाट मानली जाऊ शकेल. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी एकूण मतदारांमध्ये तरुण मतदारांची संख्या लाखोंच्या घरात होती. ती वाढतच जाणार आहे. त्यामुळे त्यांची जबाबदारी मोठी आहे. राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी गृहीत धरू नये असे लोकांना वाटत असेल तर त्यांनी शहाणे होणे, किमान राजकारण समजवून घेणे, मतदानाची ताकद ओळखणे हाच त्यावरचा उपाय आहे. जे त्यांच्याकडे मत मागायला येतील त्यांना किमान त्यांच्या वॉर्डापुरते तरी प्रश्न लोक नक्की विचारू शकतील. वॉर्डातील मूळ समस्यांची किती सखोल माहिती आहे हे माहित करून घेऊ शकतील. लोकमत संघटित नसणे राजकारण्यांच्या नेहमीच पथ्यावर पडते हे आता लोकांनीच लक्षात घेणे आवश्यक आहे. वास्तविक, लोकशिक्षण हा निवडणूक प्रचाराचा एक उद्देश असायला हवा. पण एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणे हाच सध्याच्या प्रचाराचा एकमेव उद्देश उरला असावा. लोक सुजाण आणि समंजस झाले तर राजकीय बजबजपुरीला आळा बसण्याची शक्यता किमान तरी बळावेल. मत विकले जाणार नाही आणि ते विकत मागताना दहा वेळा विचार करायला भाग पाडले जाऊ शकेल. मतदारांना गृहीत धरता येणार नाही, लोकप्रतिनिधी त्यांना उत्तरदायी आहेत इतके जरी पक्ष आणि नेत्यांच्या लक्षात आले तरी पुरे होऊ शकेल.

# एकाच दिवसात ३० लाख वृक्षलागवडीचा इंडियन बुक ऑफ रेकॉर्डचा ढोल; प्रत्यक्षात वृक्षांची उपेक्षा!

## निदान दर्शनी भागातील रेल्वे स्टेशनवरील वाळलेल्या झाडांकडे जिल्हाधिकाऱ्यांनी 'विवेक' जागा ठेवून पाहावे-डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

**हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची "इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड" मध्ये नोंद झाल्याचा अभिमान व्यक्त करत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.**



मात्र, या वृक्षलागवडीचा खरा चेहरा वेगळाच असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. "वृक्षलागवड ही केवळ इव्हेंट म्हणून न करता, तिचे संगोपन व संवर्धन महत्त्वाचे असते. निदान बीड रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागातील लागवड केलेल्या झाडांची तरी जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घ्यावी," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड शहरातील पालवण येथील नव्या रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटनापूर्वी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य सिमेंट रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फूट उंचीची झाडे लावण्यात आली होती. मात्र उद्घाटनाचा सोहळा संपताच या झाडांचे संगोपन पूर्णतः दुर्लक्षित करण्यात आले. आज त्या ठिकाणी अनेक झाडे पाण्याअभावी वाळून गेली, काही मोडून पडली, तर काही झाडे पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याकडे जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी वर्षभरात १ कोटी रोपे लावण्याचा संकल्प जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात वृक्षसंगोपनाची जबाबदारी झटकली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत पुढील चार वर्षांत १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले होते. मात्र हे स्वप्न फक्त कागदोपत्रीच पूर्ण केले जात असल्याचा आरोप आता पुढे येत आहे. "इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून सन्मान स्वीकारण्यापेक्षा, जमिनीवर लावलेल्या झाडांचे प्राण वाचवणे अधिक गरजेचे आहे. वृक्षलागवडीचे इव्हेंट करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आता तरी प्रत्यक्ष जबाबदारी घ्यावी," अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

# जागतिक धम्म दिनानिमित्त धम्म ध्वजारोहण संपन्न



अंबड । प्रतिनिधी

पंचशील धम्म ध्वज प्रेम ,दया ,शांती, मध्यम मार्ग ,ज्ञान, सदाचार, धम्माची शुद्धता दर्शविते भदंत राजरत्न ८ जानेवारी रोजी अंबड येथील महात्मा फुले नगर ज्ञानभूमी येथे जागतिक धम्म ध्वज दिनानिमित्ताने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा जालना संघटक आयुष्यमान चंद्रकांत दिल पाक यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले .याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष आयु. ज्योतीताई खरात होत्या.हा कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभा अंबड तालुका अध्यक्ष आयुष्यमान उत्तमराव येडे यांच्या नियोज ना नुसार संपन्न झाला. या कार्यक्रमास भदंत राजरत्न यांनी प्रसंगीक धम्मदेशना दिली .प्रेम ,दया ,शांती ,मध्यम मार्ग ,ज्ञान ,सदाचार ,आणि धम्माची शुद्धता ,धम्म ध्वज दर्शवितो.हे सांगितले. कार्यक्रमास अंबड शहरातील आयु.लता रुपवते, सविता वाघमारे ,भावनाताई दिल पाक, चंद्रकलाताई खंडागळे, रेश्मा ओव्हाळ ,कुमारी सुहासिनी ओव्हाळ, सयाबाई पटेकर ,आयुष्यमान प्रकाशजी घायतडक सर, आयुष्यमान अच्युतराव उघडे सर, आयुष्यमान काशिनाथराव पटेकर ,इत्यादी सह बाल बालिका कार्यक्रमास उपस्थित होते. सरनातय गाथेने फलहार घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गेवराईच्या संपादक-पत्रकार ग्रुपने सहारा अनाथालयातील मुलांना मायेची उब दिली-दादासाहेब घोडके

गेवराई । प्रतिनिधी

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ गेवराईच्या संपादक-पत्रकार ग्रुपच्या वतीने दर्पण दिनानिमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावर्षीही या ग्रुपने सहारा अनाथालयातील मुला-मुलींना भर कडाक्याच्या थंडीत ब्लँकेटचे वाटप करून मायेची उब दिली आहे. आदर्श उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या संपादक-पत्रकार ग्रुपचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे, असे गौरवोद्गार पत्रकार मित्र तथा नगरसेवक दादासाहेब घोडके यांनी केले.



पत्रकार दिनानिमित्त गेवराई येथील सहारा अनाथालयात मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार मित्र तथा नगरसेवक दादासाहेब घोडके, तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब घोडके व सहारा अनाथालयाचे संचालक संतोष गर्जे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, सूत्रसंचालन साप्ताहिक बीड राज्यकर्ताचे संपादक अमोल वैद्य यांनी, तर आभारप्रदर्शन दैनिक प्रदीप जोशी यांनी केले. प्रारंभी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आल्यानंतर संपादक शिवाजी मामा ढाकणे यांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यानप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सहारा अनाथालयाचे संचालक संतोष गर्जे म्हणाले की, गेवराईचे संपादक-पत्रकार ग्रुप गेल्या अनेक वर्षांपासून ब्लँकेटचे वाटप करून सहारा अनाथालयातील मुलांना भर कडाक्याच्या थंडीत मायेची उब देत असते आणि चिंतेश्वर मंदिरातील गो-शाळेमध्ये गो-मातांना चारा वाटप करत असते. अशा प्रकारे आदर्श सामाजिक उपक्रम राबवून संपादक-पत्रकार ग्रुप सामाजिक बांधिलकी जोपासत असते. सहारा अनाथालयाच्या वतीने आम्ही या ग्रुपचे मनापासून ऋण व्यक्त करतो आणि दर्पण दिनानिमित्त सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा देतो, अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी सहारा आनाथालयातील. १०० मुलांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास संपादक-पत्रकार ग्रुपचे काझी अमान, अमोल वैद्य, प्रदीप जोशी, शिवाजी ढाकणे, सिद्धांत मोरे, दत्तात्रय लाड, बप्पासाहेब पिंपळे, सय्यद कौसर, नितीन वाकडे, वाल्मीक कदम, सुमेध करडे , खय्युम बागवान यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# परळी उपजिल्हारूग्णालयाला एनएबीएच मानांकर पत्र



परळी । प्रतिनिधी

**क्रष्णा डायग्नोस्टिक लि. परळी गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षेचे आरोग्य सेवेसंबंधी नॅशनल अक्रिडिऐशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल (एन ए बी एच) कडून परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात क्रष्णा डायग्नोस्टिक लि. सिटीस्कॅन सेवा देणाऱ्या या खाजगी कंपनीकडून रुग्णांना गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षेचेसेवा दिल्याबद्दल न्यू दिल्ली यांच्याकडून एन ए बी एच मानांकन पत्र प्राप्त झाले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. आरूण गुट्टे सर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.**

या कार्यासाठी ऑपरेशन मॅनेजर अजित शेटफळकर यांचे मार्गदर्शन लाभले. मॅनेजर विशाल जंगम , तंत्रज्ञ अशोक मुंडे, उत्तरेश्वर राख, रंजित जायभाये, संतोष स्वामी ज्यांनी दिलेल्या सेवेबद्दल हे सन्मानपत्र प्राप्त झाले. ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा दिल्याबद्दल हे सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यापुढेही २४ तास सेवा उपलब्ध राहील अशी माहिती कंपनीचे मॅनेजर विशाल जंगम यांनी दिली.

# तरुण पिढी नैराश्याच्या गर्तेत- डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी



**धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत, विशेषतः तरुण पिढीमध्ये. नैराश्य ही आता एक गंभीर मानसिक आजार बनला आहे. पालकांनी आणि समाजाने वेळीच यावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल अनेक तरुण आणि लहान वयाची मुले नैराश्याला बळी पडत आहेत. त्यांच्यावर असलेला शैक्षणिक ताण, सोशल मीडियाचा प्रभाव आणि नात्यांमधील गुंतागुंत ही याची काही प्रमुख कारणे आहेत.**

हेल्थ-शैक्षणिक आणि करिअरचा ताण :-आजच्या स्पर्धात्मक जगात मुलांवर चांगले गुण मिळवण्याचा, उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्याचा आणि यशस्वी करिअर निवडण्याचा प्रचंड दबाव असतो. सोशल मीडियाचा प्रभाव : सोशल मीडियावर दिसणारे परफेक्ट आयुष्य, इतरांशी सततची तुलना आणि सायबर बुलिंग यामुळे तरुणांना आपण कमी पडत आहोत असे वाटू लागते. नात्यांमधील गुंतागुंत : प्रेमातील अपयश, मित्र मैत्रिणींशी होणारे वाद किंवा एकटेपणाची भावना हेदेखील डिप्रेशनचे एक कारण आहे. या काळात मुले संवेदनशील असतात. हार्मोनल बदल : तारुण्याच्याकाळात शरीरात अनेक शारीरिक आणि हार्मोनल बदल होत असतात. हे बदल भावनिक अस्थिरता निर्माण करतात आणि नैराश्याचे कारण बनू शकतात. लक्षणे पालकांनी वेळीच ओळखावी- मित्र-मैत्रिणींपासून दूर राहणे, आवडणाऱ्या गोष्टींमध्ये रस न वाटणे, जेवणाच्या आणि झोपण्याच्या सवयींमध्ये बदल. सतत उदास आणि निराश वाटणे, सतत चिडचिड करणे. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅर्डलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# निवडणूक खर्चाचे नियमाचे पालन करून नियमाप्रमाणे खर्च सादर करा-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी निवडणूक निर्णय अधिकारी निहाय गठीत करण्यात आलेल्या निवडणूक खर्च पथकाच्या कामकाजाचा आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सविस्तर आढावा घेतला.सर्वांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले.**



यावेळी जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल उपस्थित पथकातील सदस्यांना निवडणूक प्रक्रियेत उमेदवारांच्या खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवून मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक सुनिश्चित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.तसेच निवडणूक खर्चाची अचूक नोंद, प्रचार साहित्याचे निरीक्षण, वाहन तपासणी, रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंची तपासणी आदी बाबींवर विशेष लक्ष देणे, उमेदवार व राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, खर्चाच्या बाबतीत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे आदेश संबंधित पथकांना देण्यात आले.

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा पुन्हा

कंपन्यांच्या बियाण्यांवर अवलंबून राहतील, असा आरोप डल्लेवाल यांनी केला आहे. जीएम पिकांचे बियाणे मोठ्या प्रमाणात देशात येतील, स्थानिक व पारंपरिक बियाण्यांचा बाजार उद्ध्वस्त होईल आणि शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य धोक्यात येईल, अशी भीती डल्लेवाल यांनी व्यक्त केली. केंद्र सरकार आणि कृषिमंत्री विक्रमी अन्नधान्य उत्पादनाचा दावा करत असले, तरी अधिक उत्पादन म्हणजे शेतकऱ्यांची समृद्धी नव्हे. शेतकरी जास्त पीक घेत असला तरी त्याला बाजारात योग्य दर मिळत नाही, अशा स्थितीत विक्रमी उत्पादनाचा फायदा कुणाला होतो, असा सवाल डल्लेवाल यांनी उपस्थित केला.

---------

### पुराव्याच्या देवाणघेवाणीवरून

अशी मागणी कोर्टासमोर केली. यावर तपासी अधिकारी आणि सरकारी पक्षाने आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितला असून, येत्या १५ कार्यालयीन दिवसांत यावर लेखी उत्तर सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. सुनावणीत सरकारी पक्षाने कलम ३३० नुसार कागदपत्रांवर आधारित पुराव्यांची सविस्तर यादी कोर्टासमोर सादर केली. या पुराव्यांच्या यादीवर आता आरोपी पक्षाला आपले म्हणणे मांडायचे असून, कोर्टाने त्यांना तशा सूचना दिल्या आहेत.

-------------

### शेत आणि पाणंद रस्ते योजनेच्या समितीत

अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडून प्रगतशील शेतकऱ्यांची नावे मागवतील. प्राप्त यादीतून योग्य शेतकऱ्यांची निवड समिती करणार आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या नावांना जिल्हाधिकारी अंतिम मंजुरी देतील. समितीला मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आले आहे. यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा सहभाग वाढून कामकाज अधिक पारदर्शक होण्यास मदत होणार आहे, असा दावा शासन निर्णयात केला आहे.

-------------

### जनगणना २०२७ चा पहिला

गोळा करतील. मोबाइल ॲप, पोर्टल आणि रिअल टाइम डेटा ट्रान्सफरमुळे जनगणना मोठ्या प्रमाणात पेपरलेस होईल. हे ॲप ॲन्डरॉईड आणि आयओएस दोन्हीवर काम करतील. जातीशी संबंधित डेटा देखील डिजिटल पद्धतीने गोळा केला जाईल. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जनगणनेत जातींची गणना समाविष्ट केली जाईल. यापूर्वी, इंग्रजांच्या काळात १९३१ पर्यंत जाती-आधारित जनगणना झाली होती. हा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट समितीने एप्रिलमध्ये घेतला होता. २०११ च्या मागील जनगणनेनुसार, भारताची लोकसंख्या सुमारे १२१ कोटी होती, ज्यात सुमारे ५१.५% पुरुष आणि ४८.५% महिला होत्या.

------------

### काँग्रेसच्या त्या १२ नगरसेवकांचा

सदस्यत्व रद्द करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार या नगरसेवकांविरोधात तातडीने कारवाई सुरू करण्यात येणार आहे. यासंदर्भात माहिती देताना काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत यांनी सांगितले की, काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आलेल्या नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन करणे किंवा थेट दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे हे अनैतिक तर आहेच, पण घटनाविरोधीही आहे. या सर्व १२ नगरसेवकांना लवकरच कायदेशीर नोटीसा बजावण्यात येतील. काँग्रेसच्या या कठोर भूमिकेमुळे अंबरनाथमधील राजकीय वातावरण तापले असून, संबंधित नगरसेवकांमध्ये मोठी धडधड निर्माण झाली आहे. आता पुढे काय कारवाई होते, नगरसेवकांचे पद रद्द होईल का हे पाहणे महत्वाचे आहे.

--------------

### राऊत-शिंदे यांच्या भेटीनंतर

एकीकडे सभेमागून सभा आणि आरोपांच्या फैरी झाडल्या जात असताना, या दोन्ही नेत्यांमध्ये झालेली ही भेट अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली. मुंबईत आयोजित एका हिंदी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात हे दोन्ही नेते समोरासमोर आले. यावेळी केवळ नजरानजर न होता दोघांमध्ये सुमारे एक ते दीड मिनिटे बातचीत देखील झाली. राजकीय मतभेद बाजूला ठेवून या भेटीत दोन्ही नेत्यांनी एकमेकांच्या तब्येतीची विचारपूस केली. एकनाथ शिंदे यांनी राऊतांच्या आरोग्याबद्दल आस्थेने विचारणा केली, तर राऊत यांनीही त्यांना प्रतिसाद दिला. ही भेट पूर्णपणे अनौपचारिक आणि सौजन्यपूर्ण होती. यापूर्वीही जेव्हा संजय राऊत यांची तब्येत खालावली होती, तेव्हा एकनाथ शिंदे यांनी त्यांना फोन करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती आणि ते लवकर बरे व्हावेत यासाठी शुभेच्छा दिल्या होत्या. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे शिवसेना पक्ष फुटला होता. यानंतर शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला मिळाल्याने तो पक्ष अधिकृत शिवसेना ठरला होता. या सगळ्यामुळे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात प्रचंड वितुष्ट आले होते. मुंबई महानगपालिका निवडणुकीचा प्रचार सुरु झाल्यापासून ठाकरे कुटुंबीय सातत्याने एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत आहेत. संजय राऊतही त्यांच्या पत्रकारपरिषदेत सातत्याने एकनाथ शिंदे यांच्यावर आगपाखड करत असतात. मात्र, गुरूवारी हे राजकीय मतभेद बाजुला सारुन या दोन्ही नेत्यांनी सुसंस्कृतपणे एकमेकांशी गप्पा मारल्या. त्यामुळे सध्या राज्यातच्या राजकारणात या भेटीची चांगलीच चर्चा रंगली आहे.

-----------

### लाडकी बहीण योजनेत

निलंबनासह कायदेशीर कारवाईचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आला आहे. या कारवाईमुळे सधन असूनही योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

----------

### शासन आदेशः टप्पा अनुदानाची

आरोप काहींनी केला होता, मात्र राज्य शासनाने आता पुन्हा एकदा चौकशीचे आदेश नव्याने काढले आहेत. २५ ऑगस्ट २०२५ रोजी च्या शासन आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश २ जानेवारी २६ रोजी नवीन आदेश राज्यातील सर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना काढले आहेत. राज्यातील २० टक्के ४० टक्के ६०% आणि ८० टक्के शाळा अनुदानाची नव्याने चौकशी आणि तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये वर्ग, तुकड्या, शिक्षक भरती, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती आदींची चौकशी केली जाणार. यामध्ये ज्या ठिकाणी शाळेला मान्यता दिली शाळा त्याच ठिकाणी आहे का, यु-डायस क्रमांक आहे का, त्या शाळेला मान्यता आहे का, टप्पा अनुदान मंजूर शिक्षक कर्मचाऱ्यांना मिळतो का, विद्यार्थ्यांची संख्या, वर्ग तुकड्यांची संख्या, वैयक्तिक मान्यता, आवक - जावक रजिस्टर आहे का, शालार्थ आयडी मान्यता आदेश आहेत का, आरक्षणाचे धोरण पालन केले आहे का, बायोमेट्रिक पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे चेहरा ओळख नोंद आहे का, टप्पा अनुदानात संबंधित कर्मचारी यांना देयके देण्यात येतात का, या संदर्भातील सर्व चौकशी केली जाणार आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांसह मुंबई या उपनगरामध्ये देखील चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातील शाळांची तपासणी ही जालना जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी. माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी आणि वेतन पथक अधीक्षक यांनी करण्याचे आदेश आहेत. त्यामुळे आता संस्थाचालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

---------

# ना.पंकजाताई मुंडे शनिवारी गहिनीनाथ गडावर ; संत वामनभाऊ महाराजांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यास राहणार उपस्थित

बीड । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे उद्या (ता. १०) शनिवारी गहिनीनाथ गडावर येणार आहेत. थोर संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यास त्या उपस्थित राहणार आहेत.**



वारकरी संप्रदायातील थोर संत वै. वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा १० जानेवारीला गहिनीनाथ गडावर संपन्न होत आहे. यंदाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत. पुण्यतिथीला गडावर येण्याची लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांची परंपरा पंकजाताई मुंडे यांनी देखील पुढे जोपासली असून दरवर्षी त्या दर्शनासाठी गडावर येतात. एक भक्त म्हणून गडावर विविध विकास कामासाठी त्यांनी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी दिला होता. शनिवारी सकाळी ११ वाजता पंकजाताई मुंडे यांचे गडावर आगमन होणार असून दर्शन व किर्तनाच्या कार्यक्रमास त्या उपस्थित राहणार असल्याचे त्यांच्या संपर्क कार्यालयातून सांगण्यात आले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ०९ जानेवारी २०२६



## थोडक्यात



### छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थीनींची माजलगाव पोलिस स्टेशनला भेट

माजलगाव : पोलीस वर्धापनदिनानिमित्त येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी दि.८ जानेवारी गुरुवार रोजी माजलगाव शहर पोलीस स्टेशनला भेट दिली. पोलिस स्टेशनचे कामकाज कसे चालते, सायबर माहिती, महिलांच्या सुरक्षेची माहिती, महिला व मुलींचे स्वसंरक्षण या संबंधी सविस्तर माहिती विद्यार्थीनींना देण्यात आली. यावेळी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ, पोलिस उपनिरीक्षक केरबा माकणे, महिला पोलिस हवालदार शेख मॅडम, क्रीडा शिक्षक माधव घोलप, अनंत शेजुळ, तुळशीराम साळवे यांच्यासह छत्रपती शिवाजी विद्यालयातील वर्ग ८ ( ब ), ९ ( ब ) या वर्गातील विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

### त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने एक दिवसीय युवा कार्यशाळा

माजलगाव : त्रिरत्न बौद्ध महासंघ आयोजीत आधुनिक जगात आंबेडकरी युवक या विषयावर एक दिवशीय युवा कार्यशाळा रविवार दि ११ जानेवारी सकाळी ९:३० आयोजित करण्यात आली आहे.युवकांनी केवळ महत्त्वाकांक्षाच नव्हे, तर चारित्र्य, सत्यनिष्ठा आणि नैतिक सामर्थ्य जोपासले पाहिजे. या दृष्टीने

त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने एक दिवशीय युवा कार्यशाळा फ्लाईंग बर्डस् अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये रविवार दि. ११ जानेवारी सकाळी ९:३० ते ५:३० दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.आधुनिक जगात आंबेडकरी युवक या विषयावर पुणे येथील धम्मचारी ज्ञानसंभव व धम्मचारी सामसिद्धी हे मार्गदर्शन करणार आहेत. युवक-युवतींनी कार्यशाळेला उपस्थित रहावे असे आवाहन धम्मचारी अमोलरत्न,धम्मचारी मंजुरक्षित,धम्ममित्र नवनाथ शिनगारे, धम्ममित्र लक्ष्मन पोटभरे ,धम्ममित्र दीपक भालेराव , धम्म मित्र लक्ष्मण सहजराव,धम्ममित्र वंदना नाकलगांवकर,धम्ममित्र रामभाऊ बनसोडे ,धम्ममित्र आकाश शिंदे , धम्ममित्र सम्राट डोंगरे ,प्रा.सुदर्शन स्वामी,रविकांत उघडे, सचिन उजगरे, , किरणताई ढाकरगे, पुष्पाताई रणदिवे, मुरलीधर साळवे, जी.एन. घनघाव,,ज्योती साळवे, राहुल निसर्गंध, मिना राऊत, अभिजीत साळवे आदी धम्म बांधवांनी केले आहे.

### गोविंद बजाज यांना मातृशोक

माजलगाव : शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, माहेश्वरी सभेचे माजी जिल्हाध्यक्ष गोविंद बजाज यांच्या आई श्रीमती कौशल्याबाई सुखलालजी बजाज यांचे आज ७ जानेवारी रोजी सकाळी वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. श्रीमती कौशल्यबाई बजाज यां अतिशय धार्मिक वृतीच्या होत्या. वृद्धत्वमुळे त्यांचे आज रहात्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा गोविंद बजाज, दीर,पुतणे,नातवंड असा मोठा परिवार आहे. आज दुपारी शहरातील राजस्थानी वैकुंठ धाम येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी माजी आ राधाकृष्ण होके पाटील, उद्योजक, व्यापारी,अनेक राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक, डॉक्टर, वकील,पत्रकार, शिक्षक,रोटरी क्लब चें सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या स्मृती मध्ये गोशाळा करिता १ लाख व वैकुंठ धाम करिता ५१०००रु देण्यात आले बजाज परिवाराच्या दुःखात दै..... परिवार सहभागी आहे.



**मरणोत्तर नेत्रदान:** कौशल्यबाई बजाज यांनी मृत्युंपूर्वी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती त्यानुसार त्यांचे दोन्ही डोळे दान सरकारी नेत्र बँकेत करण्यात आले. यामुळे समजातील एका व्यक्तीस दृष्टी मिळणार आहे. असे पुण्याचें काम जाता जाता पुण्यात्मा कौशल्या बाई बजाज यांनी केले.

# गेवराई उपनगराध्यक्षपदी सौ.रेवतीताई घुबार्डे

## आबासाहेब काकडे, मुन्ना मोटे यांची स्वीकृत सदस्यपदी निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेवर राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व भाजप नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई नगर परिषदेत भाजपने एकहाती सत्ता मिळवली. नगराध्यक्षपदी सौ गीताभाभी बाळराजे पवार यांची मोठ्या मताधिक्याने निवड झाल्यानंतर, उपनगराध्यक्षपदी सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांना संधी देण्यात आली आहे. तर स्वीकृत सदस्य पदी आबासाहेब काकडे आणि मुन्ना मोटे या दोघांची वर्णी लागली आहे. आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला नगर परिषदेमध्ये प्रतिनिधित्व दिल्याने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे धनगर समाज बांधवांनी आभार मानले.



गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांची मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजप नेते बाळराजे पवार यांच्या सूचनेवरून, प्रभाग क्रमांक ५ मधून विजयी झालेल्या भाजपच्या सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांची उपनगराध्यक्षपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. त्यासोबतच भाजपचे आबासाहेब अंकुशराव काकडे आणि मुन्ना भैया मोटे यांची स्वीकृत नगर सेवक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. गेवराई नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे एकनिष्ठ सहकारी माजी नगरसेवक अंकुशराव काकडे यांचे चिरंजीव आबासाहेब अंकुशराव काकडे यांच्या माध्यमातून घनगर समाजाला संधी देण्यासाठी त्यांचा नावाची शिफारस केली. त्यास भाजपा नेते बाळराजे पवार यांनीही तात्काळ पाठिंबा दिला. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार या दोन्ही नेत्याच्या सामंजस्यपणामुळे आता गेवराई नगर परिषद सभागृहात विविध समाजाला नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व मिळाले आहे.

मुन्ना मोटे यांच्या रूपाने मराठा तर आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला सत्तेत सहभागी करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे सर्व समाज बांधवांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा भाजप नेते बाळराजे पवार, जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, युवानेते रोहित पंडित, युवानेते शिवराज पवार आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा गटनेते ड राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्यासह सर्व नगरसेवक भाजप पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. निवडीनंतर गुलाल उधळून, ढोलीबाजा वाजवत कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला.

# आ.धस यांच्या पाठपुराव्यातून आष्टी तालुक्यातील गरजू रुग्णांना ७ लाख २० हजारांची मदत मंजूर

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील विविध अपघातातील जखमी आणि गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना आमदार सुरेश अण्णा धस यांच्या विशेष पाठपुराव्यातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून लाखो रुपयांची मदत मंजूर झाली आहे. यामुळे आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे.

**रस्ते अपघातातील जखमींना मदतीचा हात**

देवी निमगाव (ता. आष्टी) येथील एक तरुण शेतमजूर रडालगत उभा असताना, देवी निमगाव ते कडा मार्गावर जाणाऱ्या क्रेटा गाडीने त्याला जोराची धडक दिली होती. या भीषण अपघातात त्याच्या पाय आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, सध्या त्याच्यावर अहिल्यानगर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याचे पाहून रमेश गावंडे, बिटू पोपळे आणि उपसरपंच यांनी आमदार सुरेश अण्णा धस यांची भेट घेऊन या परिस्थितीची कल्पना दिली होती. त्यानुसार, या तरुणाला १ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

**इतर लाभार्थ्यांनाही मिळाला आधार**

याचबरोबर इतरही अनेक रुग्णांना या निधीतून दिलासा मिळाला आहे:

उत्तम रामराव आजबे (रा. शिराळ): मेंदूच्या आजाराने त्रस्त असलेल्या आजबे यांच्यावर मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यांना १ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे.

सत्यवान हरिभाऊ वाघमारे (रा. केरुळ): अपघातात जखमी झालेल्या वाघमारे यांना ७० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

मंगलबाई नानाभाऊ आंधळे (रा. निबोडी): विघ्नहर्ता हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचार घेत असलेल्या आंधळे यांना ५० हजार रुपयांची मदत मिळाली आहे.

**कार्यालयीन तत्परतेमुळे मदत मार्गस्थ**

या सर्व रुग्णांच्या कागदपत्रांची पूर्तता आणि पाठपुरावा आमदार सुरेश अण्णा धस यांचे कार्यालय प्रमुख विकास तात्या साळवे यांनी तातडीने केल्यामुळे ही मदत कमी वेळेत मंजूर होऊ शकली. आमदारांच्या या संवेदनशील निर्णयामुळे गोरगरीब रुग्णांच्या उपचाराचा मार्ग सुकर झाला असून, संबंधित कुटुंबांनी त्यांचे आभार मानले आहेत.

पान ६ वरुन...

### स्वप्ने मोठी पहा, प्रशासन

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी म्हणाले की, दिव्यांग मुलांनी प्रत्येक क्षेत्रात उच्च स्तर गाठला असून बीड जिल्हा प्रशासन सदैव त्याच्या पाठीशी उभे आहे असे सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना तुम्हाला भविष्यात काय व्हायचे आहे असा प्रश्न विचारल्यास विद्यार्थ्यांनी क्लास वन अधिकारी, पोलीस, डॉक्टर, चित्रकार होण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले की,बीड जिल्ह्यात साडेपाच हजार विद्यार्थ्यांना युडीआयडी कार्ड देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. दोन महिन्यांपूर्वी ५०० विद्यार्थ्यांना कार्डे दिली आहेत. शिष्यवृत्तीसाठी हे कार्ड अनिवार्य असून, या वर्षाखेरपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून दिला जाईल असे सांगितले. मान्यवरांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.योगेश्वरी शिक्षण संस्था परिसरातील हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ व पु. बाबासाहेब परांजपे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ध्वजवंदन व विद्यार्थी संचलन झाले. तसेच क्रीडा ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. क्रीडा ज्योतचे संचलन राज्यस्तरीय पारितोषिक विजेत्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी केले. प्रास्ताविक प्रियाराणी पाटील यांनी केले.संचालन मुख्याध्यापक आनंद टाकळकर तर उपस्थितांचे आभार अंकुश नखाते यांनी मानले.

### गेवराईत ४ जानेवारीपासून

करुन टाकळी येथील भागवताचार्य ह.भ.प. केशव महाराज शास्त्री घुले यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. नित्यनेमाने रोज रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तने संपन्न होणार आहेत. सोमवार दि.५ रोजी भागवताचार्य तथा श्री क्षेत्र ब्रम्हनाथ संस्थान ब्र. येळंब येथील महंत ह.भ.प. रामेश्वर महाराज शास्त्री, मंगळवार दि.६ रोजी ह.भ.प. भूषण महाराज तळणीकर, बुधवार दि.७ रोजी छ. संभाजीनगर येथील ह.भ.प. सचिन महाराज ढोले, गुरुवार दि.८ रोजी श्री सदगुरू कल्याण स्वामी संस्थान चकलांबा येथील रामायणाचार्य ह.भ.प. साध्वी सोनाली दीदी, शुक्रवार दि.९ रोजी श्री क्षेत्र विठ्ठल गड संस्थान पाटोदा येथील वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड पुरस्कार प्राप्त ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज, शनिवार दि.१० रोजी छ. संभाजीनगर येथील रिटायर्ड ख.-.ड./(भा.प्र.से.) ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड, रविवार दि.११ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत गोंदी येथील रामायणाचार्य ह.भ.प. राजेंद्र महाराज वाघमारे यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या भव्य कीर्तन महोत्सव काळात महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, संत महंत तसेच गायक-वादक, टाळकरी, हार्मोनियम वादक,विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद उपस्थित राहणार आहेत.या सर्व कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांच्या सह प्रतिष्ठानच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### श्रीराम कथेमुळे भक्ती

मिळणार आहे.

दिनांक ११ ते १७ जानेवारी दरम्यान दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४ या वेळेत श्रीराम कथा होणार असून, मकर संक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष कथा आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने आष्टीसह परिसरातील २० ते २५ गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा अंदाज असून, त्या अनुषंगाने सर्व सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांनी सांगितले की,''श्रीराम कथेच्या माध्यमातून समाजात भक्ती, संस्कार व सद्विचारांचा प्रसार व्हावा, हा आमचा उद्देश आहे. सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन आ.सुरेश धस आणि मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश धस प्रतिष्ठानच्या संयोजन समितीने यांनी केले आहे.

### पोटच्या मुलीवर लैंगिक

व भक्कम पुराव्यानिशी सादर करण्यात आले. सदर खटला न्यायमुर्ती एस.एस. घोरपडे विशेष सत्र न्यायालय, बीड यांचे न्यायालयात चालला. न्यायालयाने पुराव्यांचा सखोल विचार करून आरोपीस दोषी ठरवले. नराधम आरोपीस कलम १० अंतर्गत ७ वर्षे सक्तमजुरी, कलम १२ अंतर्गत ३ वर्षे सक्तमजुरी, कलम ११५ अंतर्गत ६ महिने शिक्षा, आर्थीक दंड व पीडितेला भरपाई अशी शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी केला तर सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ए. बी. तिडके यांनी जोरदार युक्तीवाद केला आहे. तसेच पैरवी अधिकारी म्हणुन श्रेणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद सानप यांनी कामकाज पाहीले आहे.


## जाहिर प्रगटन

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी.विभाग)**
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६ Emailid-tahshildarambad@gmail.com
**जा.क्र.२०२५/सेतु/कावी - १६३८ दिनांक:- २४/१२/२०२५**
**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय अर्जदार श्रीमान / श्रीमती हारुण मुसा पठाण रा. दुनगांव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत : च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हारुण मुसा पठाण | स्वत : | ०८/०७/१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-दिले आहे. / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जाहिर प्रगटन

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी.विभाग)**
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६ Emailid-tahshildarambad@gmail.com
**जा.क्र.२०२५/सेतु/कावी - १०२७ दिनांक:- ०७/१०/२०२५**
**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय अर्जदार श्रीमान / श्रीमती शेख खलील शेख अब्दुल्ला रा.दुनगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत : च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख खलील शेख अब्दुल्ला | स्वत : | ०६/०६/१९८१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-दिले आहे. //२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जाहिर प्रगटन

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी.विभाग)**
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६ Emailid-tahshildarambad@gmail.com
**जा.क्र.२०२५/सेतु/कावी - १६३६ दिनांक:- २४/१२/२०२५**
**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय अर्जदार श्रीमान / श्रीमती मोबीन बशीर पठाण रा.दुनगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत : च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोबीन बशीर पठाण | स्वत : | ०६/१०/१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-दिले आहे. //२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जाहिरनामा

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १९९१/२०२५**
**रमेश पि. बाबुराव आडे व इतर वि. निरंक**
**विधीज्ञ ॲड ए.ए. हसेगांवकर**
**मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) रमेश पि. बाबुराव आडे, वय ४४ वर्षे, धंदा - नौकरी, रा. अंबिका नगर, पालवण रोड, बीड, ता.जि. बीड २) गणेश पि. बाबुराव आडे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. बावी, पो. उपळी, ता. वडवणी, जि.बीड ३) कविता भ्र. गिन्यानदेव राठोड, वय-४२ वर्षे, धंदा-शेती, रा. खळवट लिमगाव, ता. वडवणी, जि.बीड ४) सुनिता भ्र. उत्तम राठोड़ वय-४७ वर्षे, धंदा-शेती, रा. जामगा तांडा, ता. तालखेड, ता. माजलगाव, जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे बाबुराव दामु आडे यांचे दिनांक २९/०७/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क.३ व ४ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे बाबुराव दामु आडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत बाबुराव दामु आडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०२/२०२६ आहे.

आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**क. लिपीक**
**३ रे सह दिवाणी न्यायालय**
**व. स्तर बीड**

**आदेशावरून,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

## जाहिरनामा

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी.विभाग)**
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६ Emailid-tahshildarambad@gmail.com
**जा.क्र.२०२५/सेतु/कावी - ११९६ दिनांक:- ०७/१०/२०२५**
**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय अर्जदार श्रीमान / श्रीमती रईस मकबुल शेख रा.दुनगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत : च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अरिस रईस शेख | मुलगा | १३/०१/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-दिले आहे. //२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जाहिर प्रगटन

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी.विभाग)**
**दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६**
Emailid-tahshildarambad@gmail.com
**जा.क्र.२०२५/सेतु/कावी - १६३७ दिनांक:- २४/१२/२०२५**
विषय - जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत. (जन्म - मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)

अर्जदार श्रीमान / श्रीमती अन्सार मुसाखान पठाण रा. दुनगांव ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या स्वत: नामे अन्सार मुसाखान पठाण दि. ०२/०३/१९९४ जन्म - मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबधित अर्जदार विरुध्द ग्रामपंचायत कार्यालय दुनगांव नगर पंचायत कार्यालय दुनगांव यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा.नि जमृनों २५२५ (ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क.दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत आक्षेप या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावा.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# राज्यात रब्बी पीक पेरा ६३४ लाख हेक्टरवर

## गेल्या वर्षीच्या तुलनेत १६.४० लाख हेक्टरने वाढ

पुणे : यंदाच्या रब्बी हंगामात गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक क्षेत्र पिकांनी व्यापले आहे. जानेवारीच्या २ तारखेपर्यंत देशभरात सुमारे ६३४ लाख हेक्टरवर रब्बी पीक क्षेत्र होते. या हंगामात रब्बी पीक क्षेत्रात चांगली वाढ झाली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात एकूण क्षेत्रात १६.४० लाख हेक्टरने वाढ झाली आहे. गहू पेरणी ३३४ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत गहू पीक क्षेत्रात ६ लाख हेक्टरने वाढ झाल्याचे दिसून आली आहे. तर भात पीक पेरणीने २.६७ लाख हेक्टरने आघाडी घेतली असल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिली आहे.

गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील एकूण ६१७.७४ लाख हेक्टरच्या तुलनेत झालेली ही वाढ शेतीतून अधिक उत्पादनाला चालना देईल. तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुधारणा होण्यास मदत करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली



आहे. कडधान्ये लागवडीतही वाढ झाली आहे. यंदा कडधान्ये पीक क्षेत्र १३४.३० लाख हेक्टरवर विस्तारले आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत १३०.८७ लाख हेक्टरच्या तुलनेत यंदा पीक क्षेत्र ३.४४ लाख हेक्टरने अधिक आहे. हरभरा पीक लागवड क्षेत्रात ४.६६ लाख हेक्टरने लक्षणीय वाढ झाली आहे. यंदा हरभरा पीक ९५.८८ लाख हेक्टरवर आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाने जारी केलेल्या अहवालानुसार, ज्वारी, बाजरी आणि नाचणीसारख्या भरड धान्यांची पेरणी ५१.७९ लाख हेक्टरवर झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील ५०.६६ लाख हेक्टरच्या तुलनेत यंदा भरडधान्यांखालील क्षेत्र १.१३ लाख हेक्टरने वाढले आहे. तेलबिया पीक ९६.३० लाख हेक्टरवर विस्तारले आहे. गेल्या वर्षाच्या याच कालावधीतील तेलबिया पीक क्षेत्र यंदा ३ लाख हेक्टरने वाढले आहे. मान्सून हंगामातील चांगल्या पावसामुळे रब्बी पीक क्षेत्र वाढले असल्याचे सांगितले जात आहे. सध्या देशातील काही भागात आता भुईमूग पेरणी सुरु झाली आहे. यामुळे एकूण रब्बी पीक क्षेत्र आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## वासरांच्या जलद वाढीसाठी काफ स्टार्टर

अनेक पशुपालक गाय, म्हैस तयार करण्यासाठी वासरांचे चांगल्या प्रकारे संगोपन करतात. वासरांच्या आहारात मिल्क रिप्लेसर वापरलं जातं. त्याचा वासरांच्या वाढीमध्ये मोठा फायदा होतो पण मिल्क रिप्लेसर बरोबरच जर काफ स्टार्टरचा वापर सुरू केला तर ते त्यांच्या जलद वाढीसाठी मदत करते आणि वासरांना सगळी पोषण तत्व पुरवत असते.

काफ स्टार्टर म्हणजे काय?

काफ स्टार्टर म्हणजे वासरांकरिता करिता वापरला जाणारा घन स्वरूपातील पोषणयुक्त खुराक. काफ स्टार्टर देण्याची योग्य वेळ म्हणजे वासरांच्या वयाच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते चार महिन्यांपर्यंत आहे. सुरुवातीच्या काळात काफ स्टार्टरची मात्रा ही कमी असावी नंतर हळूहळू ती वाढवली जाते. सुरुवातीच्या काळात अगदी शंभर ग्राम पासून सुरुवात करावी आणि नंतर एक ते दीड किलोपर्यंत काफ स्टार्टर तुम्ही वासरांना देऊ शकता. यामध्ये कडधान्य व पेंडी, भुसा, प्राणिजन्य प्रथिने युक्त पदार्थ, जीवनसत्व, क्षार, प्रतिजैविके या घटकांचा स्टार्टर बनवण्यात समावेश असतो.

काफ स्टार्टर मध्ये असलेले घटक : काफ स्टार्टर मध्ये २२ ते २६ टक्के प्रथिने असतात. चार टक्के स्निग्ध पदार्थ, सात टक्क्यांपर्यंत तंतुमय पदार्थ,ऍसिड इन्सोल्युबल ऐश २.५%, आयोडीनयुक्त मीठ एक टक्का, कॅल्शिअम व फॉस्फरस ०.५% हे कमीत कमी असतं. काफ स्टार्टर मध्ये , ३, या जीवनसत्त्वांचा समावेश असतो. त्याचबरोबर अल्फा टॉक्सिन बाईंडरचा देखील समावेश असतो. वासरांच्या चांगल्या वाढीसाठी त्यांच्या आहारामध्ये या सर्व घटकांचा समावेश असणं गरजेच आहे त्यातल्या त्यात प्रथिनांचा वापर असणं अत्यंत गरजेचे आहे. अमिनो आम्ल हे शरीरातील स्नायूंची झपाट्याने वाढ व्हायला मदत करते त्यामुळे शरीरात अमिनो आम्लं अत्यंत महत्त्वाचे काम करत असते. लहान वासरां मध्ये प्रथिनांची गरज हे खूप जास्त



असते. जसे जसे त्यांचे वय वाढते तसतशी प्रथिनांची गरज कमी होत जाते. जन्म झाल्यावर वासरांमध्ये लगेच काठी पोटाची वाढ झाली नसल्याने त्यांच्या आहारात जास्तीत जास्त उपलब्धता असणाऱ्या प्रथिनांचा समावेश करणं गरजेचं असतं. नर व मादी वासरांची वाढ ही तीन महिन्यांपर्यंत सारखी होत असते परंतु तीन महिने झाल्यावर मादी वासरांची वाढ नर वासरांच्या तुलनेत कमी होते. काफ स्टार्टर बनवण्यासाठी जर तुम्ही खाद्य घटकांची निवड करणार असाल तर त्या घटकांची त्या पदार्थांमधील पोषक तत्वांचे प्रमाण हे लक्षात घ्यायला हवे. काफ स्टार्टर हे एक गोळी किंवा कांडी पेंडेच्या स्वरूपात असते.

काफ स्टार्टर बनवताना तीन ते पाच टक्क्यांपर्यंत मळीचा वापर केला तरी चालतो. जर तुम्ही गोळी युक्त काफ स्टार्टर चा वापर करणार असाल तर त्यामुळे काठी पोटातील द्रावणाचा सामू कमी होण्याची शक्यता असते सामू कमी झाल्यानं आम्लधर्मीय पदार्थाचं पचन झाल्याचं दिसून येते. जर तुम्ही काफ स्टार्टर चा वापर चालू केला आणि तुमचे वासरू हे चांगल्या प्रकारे काफ स्टार्टर खाऊ लागले तर त्याचे प्रमाण हे एक ते दीड किलोपर्यंत वाढ वावे त्यानंतर तुम्ही वासराला आईपासून दूर करण्याची प्रक्रिया चालू करू शकता.

## सेंद्रीय हळद तयार करण्याची प्रक्रिया

ताजी हळद काढणीनंतर हळकुंडे स्वच्छ पाण्याने दोन ते तीन वेळा धुवून माती आणि मुळांपासून स्वच्छ केली जातात. पारंपरिक पद्धतीमध्ये ओल्या हळदीचे कंद शिजवून वाळवले जातात, मात्र काही सेंद्रिय प्रक्रिया करणारे शेतकरी उकळण्याऐवजी नैसर्गिक वाळवणीला प्राधान्य देतात. हळदीचे कंद शिजवण्याची पद्धत वगळून सेंद्रिय हळद प्रक्रिया ही हळदीच्या उत्पादनाची एक पर्यायी आणि नैसर्गिक पद्धत आहे, जी विशेषतः सेंद्रिय शेतकरी किंवा कमी प्रमाणात प्रक्रिया करणाऱ्या शेतकरी समूहांसाठी उपयुक्त आहे. स्वच्छ धुतलेले हळदीचे कंद सावलीत किंवा सौम्य उन्हात सुमारे १५-२० दिवस वाळवले जातात. आधुनिक हळद प्रक्रियेमध्ये ओल्या हळदीपासून मशिनच्या सहाय्याने छोट्या छोट्या चकत्या तयार केल्या जातात आणि सौम्य उन्हात वाळवल्या जातात. यामुळे ६-७ दिवसांच्या कमी कालावधीमध्ये हळद वाळवली जाते. सेंद्रिय हळद वाळवण्यासाठी नैसर्गिक सूर्यप्रकाशाचा वापर केला जातो, ज्यामुळे तिचे पोषणमूल्य टिकून राहते. काहीवेळा सौर वाळवण यंत्राचा वापर करूनही हळद वाळवली जाते. पारंपरिक पद्धतीने उन्हात वाळवल्यास धूळ, कीड आणि आर्द्रतेमुळे अन्न खराब होण्याची शक्यता अधिक असते. मात्र, सौर वाळवण यंत्राच्या मदतीने स्वच्छ, सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने वाळवण प्रक्रिया केली जाते. शेवटी, हळद दळण्याची प्रक्रिया केली जाते, जिथे ती बारीक पूड स्वरूपात बदलली जाते किंवा संपूर्ण कंद स्वरूपात साठवली जाते. सेंद्रिय हळदीचे उत्पादन करताना कोणतेही रासायनिक पदार्थ, कृत्रिम रंग किंवा प्रिझर्व्हेटिव्ह्स वापरले जात नाहीत, त्यामुळे तिची नैसर्गिक चव, सुगंध आणि औषधी गुणधर्म टिकून राहतात. योग्य प्रकारे साठवणूक केल्यास सेंद्रिय हळद दीर्घकाळ ताजी आणि गुणवत्तापूर्ण राहते.

चित्र २. सेंद्रिय हळद प्रक्रिया

सेंद्रिय हळदीचे फायदे : हळदीत कर्क्युमिन



नावाचा घटक असून तो जंतू, बुरशी, आणि विषाणूंविरुद्ध लढतो. सांधेदुखी, सूज, आणि त्वचेच्या समस्यांवर उपयुक्त. हळद शरीरातील विषारी पदार्थ कमी करते. हळदीचा उपयोग गॅस, अपचन, आणि जळजळ कमी करण्यासाठी होतो. हळद नियमित सेवन केल्याने शरीराची रोगप्रतिकारक क्षमता सुधारते. हळदीचा उपयोग मसाल्यांमध्ये प्रमुख आहे. अन्नपदार्थांना आकर्षक रंग आणि स्वाद प्रदान करते. खाद्यपदार्थ टिकवण्यासाठी हळदीचा उपयोग होतो. सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून ती वापरली जाते. हळद फेसपॅकमध्ये वापरल्याने त्वचा उजळते. हळदीतील प्रतिजैविक घटक त्वचेला स्वच्छ ठेवतात. त्वचेच्या जखमा लवकर बऱ्या करण्यासाठी हळद उपयुक्त आहे. याशिवाय हळदीचा उपयोग विविध उत्पादनांमध्ये होतो. हळदीपासून नैसर्गिक रंग तयार करतात. विरोधक आणि जंतूनाशक औषधे तयार केली जातात. साबण, लोशन, आणि फेसपॅकमध्ये हळदीचा समावेश असतो. हळदीतील कर्क्युमिन कर्करोगाच्या पेशींविरुद्ध कार्य करतो. हळदीचे सेवन रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल कमी करते. रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवते. हळदीचे दूध सांधेदुखीसाठी प्रभावी मानले जाते. हळद नैसर्गिक कीटकनाशक आणि खत तयार करण्यासाठी उपयुक्त आहे. हळदीच्या लागवडीमुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते.

# उन्हाळी सुर्यफूल लागवड तंत्रज्ञान

सुर्यफुलाची लागवड खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामामध्ये करता येते. सुर्यफुल हे अवर्षण परिस्थिती सुद्धा सहन करणारे पिक आहे. सुर्यफुल तेलामध्ये अधिक प्रमाणात असलेल्या लिनोलेईक आम्लामुळे या तेलाचे आहारातील महत्व वाढलेले आहे. उन्हाळी सुर्यफुल हे फेरपालटीचे पिक म्हणुनही उपयोगी पडते. राज्यामध्ये प्रामुख्याने या पिकाची मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या विभागात लागवड केली जाते. विशेष की सूर्यफूल हे कमी कालावधीत (८० ते १०० दिवस) पिक तयार होते. ज्यात तेलाचे प्रमाण ३५ ते ४५ टक्के असते. तर आहाराच्या दुष्टीने करडई खालोखाल सुर्यफुल तेल अतिउत्तम आहे.

हवामान : सुर्यफुलाची वाढ चांगली व अधिक उत्पादन येण्यसाठी ५०० मि.मी. पर्जन्यमान गरजेचे आहे. पिक कालावधी व योग्य पाऊस असल्यास ३०० मि.मी. वार्षिक पर्जन्यामान देखील पिकास पुरेशे होते. बहुतांशी पिकांची पेरणी ठरावीक हंगामात वेळेत पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असते. जेणेकरून पीक वाढीच्या काळात पिकांना आवश्यक असलेले हवामान पिकांस उपलब्ध होईल.

जमीन : जमिनीची निवड करतांना जमिन ही मध्यम ते भारी व उत्तम निचरा होणारी निवडावी व जमिनीचा सामु ६.५ ते ८ इतका असावा. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक चांगले येत नाही.

पूर्वमशागत : जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या उभ्या आडव्या दोन ते तीन पाळ्या घ्याव्यात. शेवटच्या कुळवाच्या पाळीपूर्वी हेक्टरी २० ते २५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत घालावे.

पेरणीचा कालावधी : उन्हाळी हंगामात सुर्यफुलाची पेरणी ही जानेवारीचा पहिला व फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाड्यात करावी.

लागवडीचे अंतर : मध्यम ते खोल जमीन (सुधारीत वाण) यासाठी अंतर ४५ ३० से.मी. ठेवावे व या अंतरावर लागवड केल्यास रोपांची संख्या प्रतिहेक्टरी ७४००० इतकी राहील व भारी जमीनीत लागवडीचे अंतर हे ६० ३० मी. ठेवावे



व या अंतरावर लागवड केल्यास प्रतिहेक्टरी रोपांची संख्या ५५००० इतकी राखली जाईल व संकरीत वाणासाठी अंतर हे ६० ३० से.मी. ठेवावे. (रोपांची संख्या ५५००० प्रतिहेक्टरी इतकी राहील.)

बियाणे प्रमाण : पेरणीसाठी टोकन पद्धतीने संकरीत वाणाचे ५ ते ६ किलो बियाणे वापरावे व तिफणीने पेरणी केल्यास हेक्टरी संकरीत वाणाचे ८ ते १० किलो बियाणे वापरावे.

बीजप्रक्रिया : इमिडाक्लोप्रीड (७० टक्के डब्ल्यु. एस.) ५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे (लेबल क्लेम) याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी त्यामुळे नेक्रॉसिस या रोगांपासून या पिकाचे संरक्षण होते व पेरणीपूर्वी बियाण्यास २ ते २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास थायरम/बाविस्टीन(लेबल क्लेम) चोळावे. त्यानंतर मर रोगाच्या प्रतिबंधासाठी ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे.

शिफारशीत जातींची निवड : सरळ वाण - मॉडर्न, पी. केव्ही. एस. एफ-९ , टि. ए . एस ८२, एस. एस ५६, भानू, एल. एस. एफ-८ , फुले भास्कर , एल. एस-८२., संकरीत वाण : के. बी. एस. एच-१ , के.बी.एस.एच-४४ , फुले रविराज, डि. आर. एस. एच-१ , पी. केव्ही. एस. एच-२७, एल. एस. एफ. ए . एच-१७१ .

विरळणी : एका जागेवर एकापेक्षा जास्त रोपे असतील तर एकच सशक्त रोप ठेवून विरळणी करावी अन्यथा सुर्यफुलाचा आकार लहान होवून उत्पादनात लक्षणीय घट येते म्हणून विरळणी ही पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी करावी त्यामुळे उत्पादनात १८ ते २३ टक्के वाढ होवू शकते.

आंतरमशागत : पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी दोन रोपांत ३० सेंमी अंतर ठेवून विरळणी करावी. तसेच पेरणीनंतर १५ दिवसांनी एक खुरपणी करावी. तसेच दोन कोळपण्या कराव्यात. पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी व दुसरी कोळपणी ३५ ते ४० दिवसांनी करावी.

पाणी व्यवस्थापन : हलकी जमीन असल्यास पाण्याच्या सहा ते आठ पाळया, मध्यम जमीन चार ते पाच पाळया व भारी जमीनीस तीन ते चार पाळ्या देणे गरजेचे आहे. पीक वाढीच्या संवेदनशिल काळात पाण्याचा ताण पडु देवू नये याची काळजी घ्यावी जसे की कळी धरणे, फुल उमलने व दाणे भरणे या अवस्थेत पाणी वापराचे नियोजन करावे.

खत व्यवस्थापन : बागायती पिकास नत्र ६० किलो, स्फुरद ३० किलो व पालाश ३० किलो प्रति हेक्टरी प्रमाणे द्यावे. यापैकी अर्धे नत्र ३० किलो आणि स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीवेळी द्यावी. तर नत्राची उर्वरित मात्रा ३० किलो नत्र पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावे. तर गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडुळ खतातून द्यावे. सूर्यफुलाच्या फूल उमलण्याच्या अवस्थेत व त्यानंतर आठ दिवसांनी २ ग्रॅम बोरॅक्स प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे दाणे भरण्याचे प्रमाण व दाण्याचे वजन वाढते. २० किलो प्रतिहेक्टरी गंधकाचे प्रमाण आपण अमोनिअम सल्फेट किंवा एस. एस. पी. खतांतुन दिल्यास पिकाचे अधिक उत्पादन मिळते. तसेच सतत एकाच जागी पीक न घेता सूर्यफूल पिकाची फेरपालट करावी. सूर्यफुलाची मुळे जमिनीत खोलवर जातात. त्यामुळे एकाच जमिनीत दरवर्षी सूर्यफूल लागवड केल्यास जमिनीचा पोत बिघडून उत्पादन क्षमता कमी होते. तसेच रोग व किडीचा प्रादुर्भाव वाढतो. त्यासाठी कमीत कमी ३ वर्षे तरी त्याच जमिनीत सूर्यफुलाचे पीक घेणे टाळावे.

हस्तपरागीभवन : पीक फुलोऱ्यात असतांना (५० ते ६५ दिवस) जातीनुसार हाताच्या पंजास तलम कापड गुंडाळावे व फुलावरून घडयाळयाच्या काटयाप्रमाणे हळुवारपणे हात फिरवावा हे काम ७ ते ८ दिवस सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करावे. यामुळे उत्पादनात भरघोस वाढ दिसून येते. सुर्यफुलामध्ये परपरागीभवनासाठी मधमाशांचा उपयोग होतो त्यामुळे परागीभवन होवून चांगली फळ धारणा (दाणे भरतात) यासाठी मधमाशांच्या पेट्या ५ प्रतिहेक्टरी सुर्यफुल पिकांत ठेवाव्या. दरम्यान पीक फुलोऱ्यात असतांना शक्यतो कोणतेही किटकनाशक फवारू नये. उत्पादन : सुधारीत वाणाचे १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टरी व संकरीत वाणाचे १८ ते २० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.




### महत्वाच्या घटना

१७६० : बरारीघाट येथे अफगाण्यांनी मराठ्यांचा पराभव केला.
१७८८ : कनेक्टिकट हे अमेरिकेचे ५ वे राज्य बनले.
१७९० : ला बरारी घाटाच्या झालेल्या लढाई मध्ये अहमद शाह दुर्रानी ने मराठ्यांचा पराभव केला.
१८८० : क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना देशद्रोहाच्या आरोपावरुन जन्मठेपेची शिक्षा
१९१५ : महात्मा गांधींचे अफ्रिकेतुन भारतात आगमन
१९८२ : ला भारताचा पहिला शास्त्रज्ञ वर्ग अंटार्क्टिकाला पोहचला.
२००१ : नव्या सहस्त्रकातील पहिल्या महाकुंभमेळ्याला अलाहाबाद येथे प्रारंभ झाला.
२००१ : नव्या सहस्रकातील पहिले खग्रास चंद्रग्रहण दिसले.
२००२ : भारतीय महिला क्रिकेट संघाने इंग्लंड विरूद्ध एकदिवसीय मालिका जिंकली.
२००२ : महात्मा गांधी भारतात परतल्या बद्दल ९ जानेवारी हा भारतीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्याचे योजण्यात आले.
२००७ : स्टीव जॉब्स यांनी पहिला आयफोन प्रकाशित केला.
२०१२ : ला लिओनेल मेस्सी ने सतत दुसऱ्या वर्षी सुद्धा ''बैलोन डीओर'' नावाचा पुरस्कार जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : फातिमा शेख : भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका
१९१३ : रिचर्ड निक्सन अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ एप्रिल १९९४)
१९१८ : मार्क्सवादी विचारवंत लेखक प्रभाकर उर्ध्वरेषे यांचा जन्म.
१९२२ : हर गोविंद खुराना जन्माने भारतीय असलेले अमेरिकन नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ९ नोव्हेंबर २०११)
१९२१ : बिहार चे माजी मुख्यमंत्री राम सुंदर दास यांचा जन्म.
१९२६ : कल्याण कुमार गांगुली तथा अनुप कुमार चित्रपट अभिनेते (मृत्यू: २० सप्टेंबर १९९७ मुंबई)
१९२७ : सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक आणि समीक्षक रा. भा. पाटणकर यांचा जन्म.
१९३४ : महेंद्र कपूर पार्श्वगायक (मृत्यू: २७ सप्टेंबर २००८ मुंबई)
१९३८ : चक्रवर्ती रामानुजम गणिती (मृत्यू: २७ आक्टोबर १९७४)
१९५१ : पं. सत्यशील देशपांडे ख्यालगायक व पं. कुमार गंधर्व यांचे पट्टशिष्य
१९६५ : फराह खान नृत्यदिग्दर्शक
१९७४ : बॉलीवूड अभिनेता फरहान अख्तर यांचा जन्म.
१९८३ : भारतीय अभिनेता शरद मल्होत्रा यांचा जन्म.
२००० : भारताची प्रसिद्ध धावपटू हिमा दास यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : कॅरोलिन हर्षेल जर्मन-ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, ही प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ विल्यम हर्षेलची बहिण असून तिनेही ८ धुमकेतू व ३ तारकासमुह शोधले आहेत. (जन्म: १६ मार्च १७५०)
१८७३ : तिसरा नेपोलियन बोनापार्ट यांचे निधन.
१९२३ : सत्येंद्रनाथ टागोर पहिले भारतीय सनदी अधिकारी (जन्म: १ जून १८४२)
१९४५ : प्रसिद्ध राजनीती तज्ञ छोटू राम यांचे निधन.
१९७३ : फ्रांसचे पहिले अध्यक्ष लुई-नेपोलियन बोनापार्ट उर्फ नेपोलियन ३रा यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८०८)
२००३ : कमर जलालाबादी गीतकार व कवी (जन्म: १९१९)
२००४ : शंकरबापू आपेगावकर पखवाजवादक (जन्म: १९११)
२०१३ : जेम्स बुकॅनन नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थतज्ञ (जन्म: ३ आक्टोबर १९१९)

## कोथिंबीर पिकावरील महत्वाचे रोग आणि त्याची लक्षणे



कोथिम्बिर ही आपल्या रोजच्या अन्नपदार्थामधील महत्वाचा घटक आहे. कोथिंबिरीचा वापर सर्रास केला जातो. कोथिंबीरीमध्ये येणाऱ्या प्रमुख रोगांविषयी माहिती जाणून घेतल्यास यावर उपाय करता येतात आणि होणारे नुकसान टाळता येते. भुरी : ते कोवळ्या पानावर भागावर लहान, पांढरे, पावडरचे ठिपके दिसतात नंतर आकाराने वाढतात आणि पानांच्या पृष्ठभागाचा मोठे होत-होत पूर्ण पान व्यापतात.प्रभावित पाने आकारात कमी होतात आणि विकृत होतात. या रोगामुळे प्रभावित झाडांमध्ये बीज निर्मिती होऊ शकत नाही. बुरशी बीजणूंच्या (क्लीस्टोथेशीयाच्या) रूपात पिकाच्या अवशेषात टिकून राहू शकते आणि हवेद्वारे लांब अंतरावर प्रसार होतो. रोगाची सुरूवात उच्च आर्द्रता आणि मध्यम तापमान (ढगाळ हवामान) असे अनुकूल असताना होत असते; सावली असलेल्या भागात संसर्ग झपाट्याने पसरतो.

विल्ट/मर रोग : लक्षणे शेंडा सुकून जातो, पाने करपल्या सारखी दिसतात. रोप उपसल्यास मुळाचा बद्दलल्याचा जाणवतो.ज्या रोपांना प्रादुर्भाव कमी प्रमाणात झालेला असतो त्या मध्ये पाने वाळून रोपांची वाढ थांबते.अनेकवेळा झाडाला बिया धरत नाही.जरी बिया धरल्या तर हलक्या व कमी प्रतीच्या असतात.पिकामध्ये सुरवातीस जर या संक्रमण झाले तर गँभीर नुकसान होऊ शकते. हा रोग मातीजनीत बुरशीमुळे होतो आणि प्राथमिक संसर्ग मातीमध्ये असलेल्या बीजाणूंमुळे होतो. मुळाद्वारे या रोगाचा संसर्ग रोपास होतो. जास्त मातीचा ओलावा किंवा मातीचे तापमान या गोष्टी संक्रमणासाठी अनुकूल आहे.

खोड/पाने फुगणे : हा रोग फुले,पान,देठ, तसेच फळावर गाठीच्या स्वरूपात दिसून येतो.संक्रमित पानांच्या शिरा सुजलेल्या स्वरूपाचे दिसतात.या गाठी नंतर फुटतात त्यामुळे गँभीर लक्षणे दिसायला लागतात. गँभीरपणे प्रभावित झालेली झाडामध्ये मर होऊ शकते. मातीमध्ये जास्त प्रमाणात ओलावा असल्यास,विशेषत: जास्त सावली असलेल्या ठिकाणी, जेव्हा स्टेम कडक आणि रसाळ राहण्यास अपयशी ठरतो, तेव्हा गाठी असंख्य असतात.




शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत




# मतदार जनजागृतीसाठी शाळा प्रमुखांची बैठक

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेसाठी दि. १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून मतदानाच्या दिवशी मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करावे यासाठी मतदार जनजागृती अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने जालना शहरातील सर्व शाळांचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांची बैठक ७ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

या बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी शाळा स्तरावरून जनजागृती करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत मतदानाबाबत संदेश पोहोचविणे, मतदान शपथ कार्यक्रम, घोषवाक्ये, पोस्टर, रांगोळी, निबंध व वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.तसेच शाळा परिसरात तसेच पालक-शिक्षक बैठकीदरम्यान मतदानाबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच



यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, सद्यस्थितीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका, आधुनिक काळातील पालकत्वातील आव्हाने, मुलांच्या शैक्षणिक व मानसिक प्रगतीसाठी आवश्यक बाबी यासाठी ३१ जानेवारी २०२६ रोजी आयआयटी बॉम्बे येथील तज्ज्ञ हरप्रीत यांचे पालकत्व या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्रातून पालकांना मुलांच्या भविष्यासाठी योग्य दिशा देण्यास उपयुक्त मार्गदर्शन मिळणार असून, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी हे चर्चासत्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे सर्व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संबंधित शाळेच्या प्राचार्य व मुख्याध्यापकांनी केले आहे. पालकांच्या सक्रिय सहभागामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांचा शैक्षणिक तसेच वैयक्तिक विकास साध्य होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अभिनव बालकाश्रममध्ये विद्यार्थ्यांना मिष्ठान्न व फळाचे वाटप



बीड । प्रतिनिधी

बीड येथील जिल्हा उपनिबंधक सह.संस्था कार्यालयातील जिल्हा उपनिबंधक पदावर रुजू असलेले सतीष तोटावार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील अभिनव बालकाश्रममध्ये विद्यार्थ्यांना फळाचे व मिष्ठान्नाचे वाटप करून बाल गोपाळांसमवेत वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अभिवन बालकाश्रमचे अध्यक्ष राजेश्वर जाधव, अशोक इंगळे, दिपक आमटे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

बीड येथील जिल्हा उपनिबंधक सह.संस्था कार्यालयातील जिल्हा उपनिबंधक पदावर रुजू असलेले सतीष तोटावार यांचा वाढदिवस ६ जानेवारी रोजी ठिकठिकाणी साजरा करण्यात आला.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील अभिनव बालकाश्रम येथेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी सतीष तोटावार यांच्या पत्नी व अभिनव बालकाश्रममधील महिलांनी त्यांचे वाढदिवसानिमित्त औक्षण केले. तसेच अतिशय आनंदाच्या वातावरणामध्ये वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सतीष तोटावार साहेब यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत अशिर्वाद घेतले. शेवटी अभिनव बालकाश्रममधील बालकांना मिष्ठान्न व फळाचे वाटप करण्यात आले. यावेळी अभिवन बालकाश्रमचे अध्यक्ष राजेश्वर जाधव, अशोक इंगळे, दिपक आमटे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# पैशासाठी सासरच्या छळामुळे २३ वर्षीय विवाहितेची आत्महत्या

रोहिलागड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील रोहिलागड येथील एका २३ वर्षीय विवाहितेला लग्न होवून साडेतीन वर्षेही होत नाही तोच सासरच्या लोकांनी छळ करुन तीला विष प्राशन करून आत्महत्या करण्यास भाग पाडले. सदर विवाहितेचे उपचारा दरम्यान निधन झाले. याप्रकरणी द्वारकाबाई रामेश्वर जिगे (रा. मठ पिंपळगाव) यांनी अंबड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, माझी मोठी मुलगी पुनम हीचे चे मे-२०२२ मध्ये धर्मराज विष्णू पाटील (रा. रोहिलागड, यांच्याशी लग्न झाले असून, तीला श्रीयान हा २ वर्षाचा मुलगा आहे. लग्नामध्ये सासरच्या लोकांना आम्ही संसारापयोगी वस्तू भेट स्वरुपात दिलेल्या आहेत. शनिवारी सकाळी पुनमचा भाया पंढरीनाथ विष्णू पाटील यांनी फोन करून तुमच्या मुलीचे पोट दुखत असल्याने तिला छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी हॉस्पीटलमध्ये आणलेले असून तुम्ही लवकर या असे सांगितले. त्यानंतर मी व पती गॅलक्सी हॉस्पीटलला पोहचलो तेव्हा पंढरीनाथ पाटील यांनी माझ्या पतीला बाजुला घेवून पुनमने औषध घेतले असल्याचे सांगितले. त्यामुळे मी पतीसह दवाखान्यात गेले असता पुनम आयसीयूत बेडवर बेशुद्ध अवस्थेत तसेच तीच्या अंगावर मारहाणीच्या जखमा दिसुन आल्या. काल (ता. ५) सकाळी ४ वाजे सुमारास उपचारा दरम्यान तीचा मृत्यु झाला. पुनमच्या सासरच्या लोकांनी तीला शुक्रवारी (ता. २) दवाखान्यात दाखल केलेले असतांना आम्हाला जाणीवपुर्वक दुसऱ्या दिवशी शनिवारी (ता. ३) सांगितले.

पुनमला तीचा पती धर्मराज विष्णू पाटील, सासरा विष्णू पाटील, सासू लक्ष्मी विष्णू पाटील, भाया पंढरीनाथ विष्णू पाटील व जाऊ रेणुका पंढरीनाथ पाटील हे लग्नामध्ये हुंडा दिला नाही म्हणून माहेराहून पैसे आणण्याच्या तसेच तुला घरचे व शेतातले काम नीट करता येत नाही असे म्हणुन शुल्लक कारणावरुन वाद करायचे, मानसिक त्रास द्यायचे तसेच शिवीगाळ करून मारहाणही करीत असे. पुनमच्या पतीची मानलेली गुरुबहीण सारिका व तिचा पती हे अधुन मधुन रोहिलागडला येवुन पुनमच्या चुगल्या करायचे. त्यामुळे धर्मराजकडून पुनमला नेहमी त्रास झालेला आहे. या सर्वांनी तू जोपर्यंत माहेराहुन पैसे आणणार नाही, तोपर्यंत तुला आम्ही वागवणार नाही असे म्हणून पुनमकडुन उपाशीपोटी शेतातील काम करुन घेतले. पती धर्मराजने पुनमच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला वारंवार त्रास देवुन शिवीगाळ करून मारहाण करुन क्रूरतेने वागणुक दिली. त्यामुळे वरील सर्वजण पुनमच्या मृत्युस कारणीभूत झाले आहेत. या प्रकरणी द्वारका जिगे यांच्या फिर्यादीवरुन अंबड पोलिस ठाण्यात आरोपी धर्मराज पाटील, विष्णू पाटील, लक्ष्मी विष्णू पाटील, पंढरीनाथ पाटील, रेणुका पाटील, सारिका व सारिकाचा पती यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ८० (२), १८९, १८९ (२), १९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला, असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

# क्रिकेट स्पर्धेतून दर्जेदार खेळाडू घडावेत : डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

क्रीडा स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडू घडून विद्यापीठाचा सक्षम संघ तयार होतो आणि त्यातून बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढतो. खेळाडूंना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, शहरालगत अद्ययावत मैदान निर्माण करणे, क्रिकेटसाठी आवश्यक साहित्य पुरवून कौशल्यपूर्ण खेळाडू घडवण्यासाठी विविध ठिकाणी संधी उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच, क्रिकेट स्पर्धेतून दर्जेदार खेळाडू घडावेत, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व बीड शहरातील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित आंतरमहाविद्यालयीन बीड झोन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या हस्ते गुरुवारी संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर होते. अध्यक्षीय भाषणात डॉ.क्षीरसागर म्हणाले, महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कार्य अतिशय उत्कृष्ट दर्जाचे असून खेळाडूंनी सातत्याने महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी सरपंच नाना शेंडगे, डॉ. संतोष वनगुजरे (क्रीडा मंडळ सदस्य), डॉ. भारत पल्लेवाल, डॉ. तत्तापुरे, पंच अक्षय नरवडे, शिदोडचे माजी सरपंच चंद्रसेन शेंडगे, डॉ.शेख शकील, संतोष वाघमारे, डॉ.दत्ता पुरे, पल्लेवाड, वनगुजरे, सुशील शिंदे, जय गायकवाड, समीर काटकर, संतोष वाघमारे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.भागचंद सानप यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. शकील, डॉ. घोडके, डॉ. नवले यांनी परिश्रम घेतले. या क्रिकेट स्पर्धेत बीड जिल्ह्यातील विविध संघ सहभागी झाले असून परिसरातील खेळाडू व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. कार्यक्रमाचे आभार डॉ. सोनाजी गायकवाड यांनी मानले. दरम्यान, दि. ८ जानेवारी ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत ही आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा कवठेकर क्रिकेट मैदान, शिदोड येथे होत आहे.

# सोयाबीन विक्री नोंदणीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

अंबड । प्रतिनिधी

खरेदी-विक्री संघ अंबड तसेच बीएससी केंद्र ॲपद्वारे नाफेड शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील सोयाबीनची खरेदी विक्री केली जाते. यापूर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन ऑनलाइन नोंदणीसाठी खरेदी-विक्री संघाकडून ३१ डिसेंबर शेवटची तारीख देण्यात आली होती. आता यास ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली. दरम्यान २२५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. यावेळी शेतकऱ्यांकडून १,४४१ क्विंटल सोयाबीन खरेदी केल्याचे माहिती खरेदी-विक्री संघाचे चेअरमन किशोर नरवडे यांनी दिली आहे.

# उद्योजक सतीश घाटगेंच्या घरात शिरून मध्यरात्री एकाचा धुडघूस

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

घनसावंगी येथील दोन साखर कारखान्यांचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या घरात शिरून एका मद्यपीने घुडघूस घातला. साहित्याची नासधूस करून शिवीगाळ करत चांगलाच राडा केला. घराबाहेरील फॉर्च्यूनर गाडीवर दगडफेक करून काच फोडली. हा प्रकार बुधवारी मध्यरात्री १:१० वाजेच्या सुमारास केशवनगरी, शहानूरवाडी भागात घडला.

श्यामसुंदर वसंतराव उढाण (४७, रा. सिडको एन-४, गुरुसहानीनगर) असे आरोपीचे नाव आहे. त्याला जवाहरनगर पोलिसांनी घाटगे यांच्या घरातून ताब्यात घेऊन ठाण्यात आणले. घाटीत मेडिकल केले. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच उढाण याने पहाटे ४.३० वाजेच्या सुमारास ठाण्यातून धूम ठोकली. आरोपी ठाण्यातून पळून गेल्याची वार्ता शहरभर पसरताच उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. फिर्यादी सतीश जगन्नाथ घाटगे (५२, रा. केशवनगरी) यांच्या तक्रारीनुसार, मध्यरात्री त्यांच्या घराचे समोरील दरवाज्याचे लॉक तोडून एक जण आत घुसला. त्याने घरातील सामानाची नासधूस करत होता. त्याच्या हातात चाकूही असून, तो मोठ्याने तुला मारून टाकतो, असे म्हणत शिवीगाळ करत होता. त्याच्या हातात चाकू असल्याने घाटगे पुन्हा बेडरूममध्ये परतले. त्यांनी तातडीने पोलिसांना संपर्क केला. त्यानंतर जवाहरनगर ठाण्याचे कर्मचारी व उपनिरीक्षक मारुती खिल्लारे घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर सतीश यांनी हा आपलाच नातेवाईक असल्याचे स्पष्ट केले. पोलिसांच्या समोरच दोघांमध्ये प्रचंड शिवीगाळ व वादावादी झाली. त्यानंतर उढाणला घेऊन पोलिस ठाण्यात गेले. तिथे घाटगे हे तक्रार देण्यासाठी आल्याने नाईट अधिकारी उपनिरीक्षक खिल्लारे यांनी आरोपी उढाणला घाटीत मेडिकलसाठी पाठवले.

तिथून परतल्यावर घाटगे यांची तक्रार घेणे सुरू होते. त्यावेळी आरोपी उढाण याने ठाण्यातून धूम ठोकली. त्यामुळे एकच खळबळ उडाली. बुधवारी दिवसभर गुन्हे शाखा व जवाहरनगर पोलिसांचे पथक त्याचा शोध घेत होते. मात्र उढाण अद्याप पोलिसांना सापडला नाही. याप्रकरणी जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जवाहरनगर पोलिस ठण्यातून पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास उढाणने धूम ठोकली. इकडे पोलिस शोधाशोध करत असताना तो पुन्हा दर्गा परिसरातील केशवनगरी येथे गेला.तिथे लावलेल्या त्याच्या कारसह त्याने पळ काढला. विशेष म्हणजे त्याच्या कारच्या दोन चाकांची हवा अगोदर सोडण्यात आली होती. तरीही त्याने तशीच कार दामटली.


## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का, जि. बीड

Email.tahsildarshirurkasar@gmail.com

क्र. २०२५/ विलंब जन्म नोंद / कावि- (E-७२९१४६)

दुरध्वनी क्रमांक - ०२४४४-२५९३५९

### विलंब 'जन्म नोंद जाहीर प्रगटन

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चे कलम ११ (२) व ३ अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार खेडकर महेश मधुकर, रा. तिंतरवणी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी स्वतःचा जन्म दिनांक १८/०४/२००५ रोजी तिंतरवणी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून नियमानुसार अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.

**सुरेश घोळवे**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी शिरूर कासार**


# कारने दुचाकीला उडवले; बदनापूर येथील बापलेकाचा दुर्दैवी अंत

जालना । प्रतिनिधी

कारच्या भीषण धडकेत बदनापूर येथील बापलेकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी संध्याकाळी घडली. या घटनेमुळे बदनापूर शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

शहरातील हुसेन नगर येथील रहिवासी शेख अजीम नसीर (वय ४०) व त्यांचा मुलगा शेख वसीम अजीम (वय १९) हे दोघे बदनापूरहून हसनाबादकडे इस्तेमासाठी मोटारसायकलने जात असताना विल्हाडी (ता. बदनापूर) परिसरात दाभाडीहून येणाऱ्या कार क्रमांक एमएच २१ सीए ०४४३ ने त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच २० सीई ९१२५ ला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शेख अजीम नसीर व शेख वसीम यांना छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, शेख अजीम यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले, तर शेख वसीम याची उपचार सुरू असताना रात्री १ वाजता प्राणज्योत मावळली. शेख अजीम नसीर हे बदनापूर येथे हमालीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. यासोबतच मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानात समाजसेवेच्या भावनेतून कबर खोदण्याचे कार्यही ते करीत असत. त्यांच्या या निःस्वार्थ सेवेमुळे समाजात त्यांना मोठा मान व प्रतिष्ठा होती. बापलेकाचा एकाचवेळी झालेला मृत्यू मन हेलावून टाकणारा असून या घटनेने बदनापूर शहरावर शोककळा पसरली आहे. दोघांचा अंत्यविधी बदनापूर येथील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानात करण्यात आला. यावेळी बदनापूर तालुक्यासह परिसरातील हजारो आप्तेष्ट, नातेवाईक, समाजबांधव व मित्रमंडळींच्या डोळ्यांत अश्रू तर मनात वेदना होत्या.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७५२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २३/१२/२०२६

नाव बदलण्याचा

### जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुरेखा गणेश मुजमुले सर्व्हे नं.-३/२/२सिटी सर्व्हे नं. २३५२ प्लॉट नं. २६ नं.प.मि.नं.१८-१३२-२६ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१३२-२६) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- सहा मिटर कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : विक्रेत्याची मिळकत
दक्षिण- प्लॉट नं. २५
उत्तरः प्लॉट नं. २६ मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**


# पाटोदा येथील गट क्र. ७१५ मधील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

## जिल्हा प्रशासनाकडून कारवाईला वेग

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पाटोदा येथील गट क्रमांक ७१५ मधील शासकीय गायरान जमिनीवर झालेली अतिक्रमणे सहा महिन्यांच्या आत निष्कासित करण्याचे आदेश माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय आणि स्थानिक प्रशासनाने आता प्रत्यक्ष कारवाईसाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, क्रांतीनगर येथील रहिवासी शेख मोबीन हमीद यांनी ॲड नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्यामार्फत माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याचे निर्देश दिले होते. सुरुवातीला तांत्रिक कारणास्तव आदेशात गट क्रमांक ७१५ ऐवजी १७५ अशी नोंद झाली होती. मात्र, अर्जदाराने ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, जिल्हाधिकारी कार्यालयाने सुधारित गट क्रमांक ७१५ नुसार कारवाई करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या १६ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार आणि त्यानंतरच्या १ जानेवारी २०२६ च्या स्मरणपत्रानुसार, आता प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. न्यायालयाने दिलेल्या ६ महिन्यांच्या मुदतीत ही कारवाई पूर्ण करणे अनिवार्य असल्याने संबंधित ७१५ गट क्रमांकातील सर्व अतिक्रमणधारकांची ओळख पटवून त्यांना नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. उच्च न्यायालयाच्या अवमाननेची कारवाई टाळण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाला अत्यंत तातडीचे म्हणून प्राधान्य दिले आहे. महसूल अभिलेखातील गट क्रमांकाच्या दुरुस्तीसह प्रत्यक्ष जागेची मोजणी करून अतिक्रमण क्षेत्र निश्चित केले जाणार आहे. या निर्णयामुळे पाटोदा परिसरातील गायरान जमिनी बळकावणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासकीय यंत्रणा कधी प्रत्यक्ष बडगा उगारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६



# मनरेगासाठी आष्टीत दोन माजी आमदारांचे आंदोलन

## मनरेगा कामांना दुजाभाव केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

**मतदार संघात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) कोणत्याही लोकप्रतिनिधींनी मंजूर केलेली कामे असोत, ती कोणताही दुजाभाव न करता सरसकट सुरू करण्यात यावीत. अधिकाऱ्यांनी समाजासाठी काम करत असल्याची जाणीव ठेवावी आम्ही वीस वर्ष आमदारकी सांभाळली आहे त्यामुळे आम्हाला फुगेवाले समजू नये असा स्पष्ट इशारा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिला.**

अतिवृष्टीमुळे आष्टी, पाटोदा व शिरूर मतदार संघातील खराब झालेली बंधारे, रस्ते, नदीवरील पूल तसेच पाझर तलावांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. मनरेगा अंतर्गत बंद असलेल्या विहिरी व त्यांचे मस्टर तात्काळ सुरू करण्यात यावेत, या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी गुरुवार (दि.८ जानेवारी) रोजी सकाळी ११.३० वाजता आष्टी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात माजी आमदार भीमराव धोंडे बोलत होते.यावेळी माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, दीपक घुमरे, विश्वास नागरगोजे, भाऊसाहेब लटपटे, अशोक साळवे, दशरथ वनवे, धैर्यशील थोरवे, अभयराजे धोंडे, भाऊसाहेब घुले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढे बोलताना माजी आमदार धोंडे म्हणाले की, तालुक्यातील काही अधिकारी एकल कारभार करत असून मनरेगा कामांमध्ये जाणीवपूर्वक अडथळे आणले जात आहेत. सध्याचे पोलीस निरीक्षक फोन घेत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. अधिकारी हे सर्वसामान्यांचे असतात, लोकांना न्याय देणे हेच त्यांचे कर्तव्य आहे. आम्हालाही कठोर भूमिका घ्यावी लागेल, पण आम्ही कोणालाही वैयक्तिक लक्ष्य करत नाही. मात्र आंदोलनानंतरही जर दुजाभाव दिसून आला तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधींना आंदोलन करावे लागणे ही दुर्दैवी बाब आहे. मात्र झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी हे आंदोलन करावे लागले. पंचायत समिती कार्यालयात सध्या अनागोंदी कारभार सुरू असून अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेतली नाही तर खुर्चीवर बसणे अवघड होईल. जाणीवपूर्वक आमच्या कार्यकर्त्यांच्या ग्रामपंचायत कामांमध्ये अडथळे आणू नयेत, अन्यथा यापुढे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. धरणे आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन तहसीलदार वैशाली पाटील यांना देण्यात आले. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कामे सुरू करावीत, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

## स्वप्ने मोठी पहा, प्रशासन दिव्यांगांच्या सदैव पाठीशी - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वप्ने मोठी पहा, प्रशासन दिव्यांगांच्या सदैव पाठीशी उभे आहे असे मत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी येथे व्यक्त केले.

अंबाजोगाईत तीन दिवसीय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तर व्यासपीठावर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान,अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे,उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील, गटविकास अधिकारी बळवंत, गटशिक्षण अधिकारी मधुकर सुवर्णकार, सुमती बाई गुणाले शिक्षण संस्थेचे सचिव दिनकर गुणाले माजी आ. पृथ्वीराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, डॉ.संतोष मुंडे, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक आर.व्ही. सोनवळकर, संभाजी लांडे,विलास काळुंके, शेख, अशोक गंडले, ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार निर्मळे, प्रा.रोहिणी पाठक, जगधने, सुरवसे आदी उपस्थित होते. पुढेबोलताना पान ३ वर



## गेवराईत ४ जानेवारीपासून होणार संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या २१ व्या कीर्तन महोत्सवास प्रारंभ

### महोत्सवाची जय्यत तयारी सुरू -अध्यक्ष डॉ.संजय तांदळे





गेवराई । प्रतिनिधी

येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि. ४ जानेवारी २०२६ पासून भव्य कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत असून यावर्षीचा हा एकविसावा (२१) भव्य कीर्तन महोत्सव श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, नगरपरिषद सर्व्हे.नं.६३ च्या सहन जागेवर घेण्यात येणार आहे. कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा लाभणार आहे. कीर्तन महोत्सवाचे हे २१ वे वर्ष आहे. सध्या कीर्तन महोत्सवाची जोरदार तयारी चालू असून प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले योगदान देत आहेत. गेवराईकर या भव्य कीर्तन महोत्सवाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई मध्ये संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे मागील २० वर्षांपासून भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले जात आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील भाविकांचा लक्षणीय सहभाग असतो. यावर्षीच्या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ रविवार दि.४ जानेवारी रोजी सकाळी ११ वा. कलश पुजन व सायंकाळी ७ वा. दीपप्रज्वलन पान ३ वर

## आज तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील नागरिकांच्या शासकीय अडचणी, तक्रारी व प्रलंबित प्रश्नांना थेट न्याय मिळावा,या उद्देशाने बीड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६ रोजी आष्टी तहसील कार्यालयात जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा जनता दरबार दुपारी २.३० ते ३.३० या वेळेत होणार आहे.

सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण व्हावे, शासकीय यंत्रणेत पारदर्शकता यावी तसेच लोकशाही प्रक्रियेत जनतेचा थेट सहभाग वाढावा, यासाठी शासनाच्या निर्देशानुसार जनता दरबाराचे आयोजन करण्यात येत आहे. या जनता दरबारात आष्टी तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

जनता दरबारामध्ये शेतरस्ते व पाणंद रस्त्यांचे प्रश्न, अतिक्रमणासंदर्भातील तक्रारी, वैयक्तिक लाभाच्या विविध योजना, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची प्रकरणे, ७/१२ उताऱ्यातील दुरुस्ती, महसूल विभागाशी संबंधित समस्या, जन्ममृत्यू नोंदणी, तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आदी शासकीय योजनांमधील अडचणींचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.नागरिकांनी जनता दरबारात आपली तक्रार किंवा निवेदन लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त होणाऱ्या अर्जांवर संबंधित विभागप्रमुखांच्या माध्यमातून तात्काळ कार्यवाही करण्यात येणार असून, प्रत्येक अर्जाचा योग्य पाठपुरावा केला जाणार असल्याचे तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे.आष्टी तालुक्यातील नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे, त्यांच्या अडचणी तात्काळ सुटाव्यात, या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबाराचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



## आत्माराम वाव्हळ यांना 'लोकरत्न पुरस्कार' प्रदान

बीड : दर्पण दिनाचे औचित्य साधून लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'लोकरत्न पुरस्कार' पत्रकार तथा बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांना मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दर्पण दिनी बीड शहरातील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित भव्य-दिव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल आत्माराम वाव्हळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नामदेव तोकले आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संभाजी ब्रिगेड च्या वतीने दिला जाणारा महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षण क्षेत्रात महत्व पुर्ण योगदान देणारे नव्या पिढीतील उपक्रमशिल प्रा.शिक्षक नामदेव मुकूंदराव तोकले यांना देऊन सन्मानित करण्यात आले आहे. नामदेव तोकले यांनी धारूर तालुक्यातील चोरंबा येथील जिल्हा परिषद शाळेत २००५ साली प्रथम अध्यापनास प्रारंभ केला. वाका, वरपगांव आदी ठिकाणी त्यांनी अध्यापनाचे कार्य केले नामदेव तोकले हे विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने अध्यापन करून



ध्येयनिष्ठपणे गुणवंत पिढी निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत. अलिकडच्या काळात समाज माध्यमे, भ्रमण ध्वनी यामधून साठविलेल्या माहिती नुसार शिक्षण केंद्रीत झाले असले तरीही नामदेव तोकले यांच्या सारख्या वाचन, चिंतन, मनन करून ज्ञानार्जनाची प्रक्रिया विद्यार्थ्यांत रूजविणाऱ्या शिक्षकाचे कार्य दिशादायीच म्हणावे लागेल त्यांच्या सर्वांकष कार्याची नोंद घेऊनच संभाजी ब्रिगेड यांनी मराठा सेवा संघाचे मा. जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, अमर देशमुख,कवी विश्वंभर वराट,प्रविण ठोंबरे, ॲड. प्रशांत शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदरील पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल नामदेव तोकले यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## निर्भीड आणि वस्तुनिष्ठपणे पत्रकारांनी कार्य करावे -पत्रकार देशपांडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

निर्भीड व वस्तुनिष्ठपणे समाजासाठी अविरतपणे कार्य करणे पत्रकारांचे कर्तव्य आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता समाजातील प्रश्न प्रखरपणे शासन आणि जनतेपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत असे मत ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत देशपांडे यांनी राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार बंधूंचा सत्कार समारंभामध्ये प्रतिपादन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून पत्रकारिता करत असताना आलेल्या अनुभवांना शब्दांकित केले. तत्कालीन समस्या, घटना, प्रसंगांतून प्रामाणिकपणे पत्रकारितेचे कार्य उपस्थितांना सांगितले. अध्यक्षीय समारोपातून



प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी दर्पण दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. १८३२ सालापासून सुरू झालेली पत्रकारिता आज विशिष्ट उंचीवर पोहोचली असून तिला वृद्धिंगत करण्याचे कार्य पत्रकार करतात असे सांगितले. दर्पण दिनानिमित्ताने सर्व पत्रकार बांधवांना ग्रंथ, पेन व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार राम शेळके यांनी मनोगतातून पत्रकारिता करत असलेल्या अनुभवांचे कथन केले. या सत्कार समारंभासाठी धारूर शहर व परिसरातील अनिल महाजन, अतुल शिनगारे, संदिपान तोंडे, सय्यद शाखेर अली, परमेश्वर राऊत, नाथा ढगे, सूर्यकांत जगताप, अविनाश जगताप, सुभाष साखरे, मनोज जगताप, सुनील कावळे, सतीश पोदार, रवी गायसमुद्रे, सचिन घोडके, प्रदीप साखरे, विश्वास शिनगारे, शुभम शुक्ला, अविनाश ठोंबरे, सुनील तोंडे या पत्रकार बंधूंची सत्कार सोहळ्यास उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. विठ्ठल केदारी यांनी मानले.

## पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापास ७ वर्षांचा सश्रम कारावास

बीड । प्रतिनिधी

स्वतःच्या पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापास न्यायालयाने सात वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली या निकालाने शिरूर तालुक्यात समाधान व्यक्त केले जात आहे.

**शिरूर कासार पोलिसांची शिस्तबद्ध तपासाची यशोगाथा**

शिरूर कासार पोलीस झस्टेशन येथे दाखल गु.र.नं. १४७/२०२४ या अत्यंत संवेदनशील प्रकरणात शिरूर कासार पोलिसांनी केलेल्या अभ्यासपूर्ण, शिस्तबद्ध व मानवी दृष्टिकोनातून केलेल्या तपासामुळे आरोपीस कठोर शिक्षा सुनावण्यात आली आहे.


दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच वडिलांकडून वारंवार शारीरिक मारहाण व लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली. पीडितेने दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी धैर्याने शिरूर कासार पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ७४, ७५, ७६, ११५ तसेच अधिनियम २०१२ अंतर्गत कलम १० व १२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली.

तपासादरम्यान पीडितेचा सविस्तर व विश्वासार्ह जबाब, साक्षीदारांचे जबाब, तसेच आवश्यक महत्त्वाचे पुरावे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी गोळा करुन त्याची योग्य मांडणी करुन दोषारोपपत्र वेळेत पान ३ वर

## हरीबाई पारेकर यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील हरीबाई सोपान पारेकर (वय १०० वर्ष) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी दुपारी निधन झाले, सायंकाळी सहा वाजे दरम्यान त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मनोहर,वसंत,शिवाजी,विठ्ठल व विष्णू पाच मुलगे तिन विवाहीत मुली, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक मुंजा पारेकर यांच्या त्या आजी होत.



## श्रीराम कथेमुळे भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर

### आष्टीत श्रीराम कथेची आ. सुरेश धस यांच्या संयोजकत्वाखाली जय्यत तयारी

आष्टी । प्रतिनिधी

आमदार सुरेश धस प्रतिष्ठान यांच्या वतीने आष्टी येथे येत्या ११ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या भव्य श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यासाठी जोरदार तयारी सुरू असून, संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून हा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम साकार होत आहे.

या श्रीराम कथेचे निरूपण देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी करणार असून, कार्यक्रमासाठी आष्टी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात १५० ३०० फुटाचा भव्य मंडप उभारणी, ध्वनिव्यवस्था, प्रकाशयोजना तसेच भाविकांच्या बसण्याची आसन व्यवस्था अंतिम टप्प्यात असून



सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या असून, स्वागत, शिस्त, प्रसाद वाटप, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य व स्वच्छता या सर्व बाबींचे नियोजन काटेकोरपणे केले जात आहे. कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला निघणाऱ्या आकर्षक शोभायात्रेचीही तयारी देखील जोमात सुरू आहे.श्रीराम कथेमुळे आष्टीत भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर होणार असून भक्ती, उत्साह आणि अध्यात्माचा संगम अनुभवायला पान ३ वर

## दहावीच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या कलागुणांच्या प्रस्तावांसाठी मुदतवाढ -डॉ.संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शालांत प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुणांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या गुणांच्या प्रस्तावांसाठी यंदा विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. त्यानुसार आता शाळांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत कलागुणांचे प्रस्ताव सादर करता येणार आहेत. राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या, लोककला प्रकारांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात. या कलागुणांसाठीचे प्रस्ताव इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यासाठी १५ डिसेंबर अखेर, तर माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी होती.मात्र, शासकीय रेखाकला परीक्षेचा (एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड) निकाल जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला आणि लोककलांसाठीचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी या वर्षापूरती मुदत वाढ देण्यात आली आहे.तरी संबंधित इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित शाळेकडे प्रस्ताव दाखल करावेत असे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# 'हा' बडा नेता महायुतीमधून बाहेर
# अजित पवारांसाठी सर्वात मोठा धक्का!

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झुरी) यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) मोठा झटका बसला आहे. दलित मतदारांना (-क्षळीं झुरी)आकर्षित करण्याच्या उद्देशाने आरपीआय (खरात गट) सोबत केलेली युती आता धोक्यात आली आहे. आरपीआय (खरात गट)चे प्रमुख सचिन खरात यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीतून तडकाफडकी माघार घेतली आहे. त्याचबरोबर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या पाठिंब्याला नकार दिला आहे. यामुळे अजित पवारांच्या निवडणूक रणनीतीचे गणित बिघडले असून, दलित मतांच्या बाबतीत मोठा पेच निर्माण झाला आहे.

राज्यातील मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, पिंपरी चिंचवडसह एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहेत. मतदानाच्या तारखा अगदी जवळ येत असताना प्रचाराला जोरदार वेग आला



आहे. राज्यातील प्रमुख नेते सभा घेऊन प्रचार करत आहेत आणि सर्वच पक्ष या महत्त्वाच्या महापालिका जिंकण्यासाठी पूर्ण ताकद लावत आहेत. विशेषतः पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिकांवर अजित पवार यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, आता सचिन खरात यांच्या निर्णयामुळे त्यांच्या योजना धोक्यात आल्या आहेत. अजित पवार यांनी दलित मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी आरपीआय (खरात गट) सोबत युती केली होती. या युतीअंतर्गत पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये खरात गटाला काही जागा देण्यात आल्या होत्या. यातून दलित समाजातील मतदारांना आकर्षित करण्याची रणनीती आखली गेली होती. मात्र, आता सचिन खरात यांनीच निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडण्याची घोषणा केल्याने अजित पवारांसमोर मोठी अडचण उभी राहिली आहे. या माघारीमुळे खरात गटाच्या जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार कसे ठेवणार आणि दलित मतदारांचा कल काय राहील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सचिन खरात यांनी आपली भूमिका एका व्हिडीओच्या माध्यमातून स्पष्ट केली आहे. त्यात ते म्हणतात, मला सन्मानपूर्वक जागा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रात सध्या ज्या महानगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत, त्या निवडणूक प्रक्रियेतून मी बाहेर पडत आहे. कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही पक्षाला तसेच कोणत्याही उमेदवाराला माझा पाठिंबा नाही. खरात यांच्या या विधानामुळे युतीतील नाराजी उघड झाली आहे. यापूर्वी युती जाहीर झाल्यानंतरही काही जागांवरून वाद निर्माण झाल्याचे बोलले जात होते. या घडामोडीमुळे पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शरद पवार गटाची एकत्रित आघाडी असतानाही दलित मतांच्या विभागणीचा फटका बसू शकतो. प्रचार शिगेला पोहोचलेला असताना हा धक्का बसल्याने अजित पवार आता नेमकी काय रणनीती आखणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. निवडणुकीच्या निकालावर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुणे आणि सासवडला जोडणारा बोपदेव घाट ७ दिवस वाहतुकीसाठी बंद

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि सासवडला जोडणाऱ्या बोपदेव घाटातील रस्ता दुरुस्ती आणि रुंदीकरणाच्या कामामुळे हा मार्ग गुरुवार, ८ जानेवारी ते १४ जानेवारी या सात दिवसांच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहितीनुसार, बोपदेव घाटात सध्या रस्त्याचे विस्तारीकरण आणि खडीकरणाचे काम सुरू आहे. कामाचा दर्जा आणि प्रवाशांची सुरक्षा लक्षात घेता, या काळात दुचाकी, चारचाकी किंवा कोणतीही एकेरी वाहतूक सुरू ठेवणे शक्य नाही. त्यामुळे हा रस्ता पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे.



**प्रवाशांना 'वळसा'; 'हे' असतील पर्यायी मार्ग**


बोपदेव घाट बंद असल्यामुळे पुरंदर आणि सासवड भागातून पुण्यात ये-जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. सासवड-पुणे प्रवासासाठी दिवे घाट मार्गाचा वापर करावा. सासवड-पुणे प्रवासासाठी नारायणपूरमार्गे कापूरहोळ किंवा चिव्हेवाडी घाट मार्गाचा अवलंब करावा.


सासवड-कोंढवा प्रवासासाठी बोपदेव घाट हा सर्वात जवळचा आणि जलद मार्ग मानला जातो. मात्र, आता हा मार्ग आठवडाभर बंद राहणार असल्याने नोकरी, व्यवसाय आणि वैद्यकीय कारणांसाठी दररोज ये-जा करणाऱ्या हजारो प्रवाशांचा प्रवासाचा वेळ वाढणार आहे. विशेषतः कोंढवा आणि येवलेवाडी परिसरातील नागरिकांना आता दिवे घाटातून मोठा वळसा घालून प्रवास करावा लागणार आहे. रस्त्याचे काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, यासाठी प्रवाशांनी सहकार्य करावे आणि पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभाग (हवेली २) चे शाखा अभियंता देवेन मोरे यांनी केले आहे.

# रोहित पवार घड्याळाच्या प्रचारात; अजित पवारांसोबत पुण्यातून भाजपवर हल्लाबोल करणार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकांची (एश्रशलींळेप) रणधुमाळी सुरू आहे, त्यातच राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा कायमचा मित्र नसतो, असे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांनी म्हटले. अजित पवार (-क्षळीं पुरी) यांनी याबाबत भाष्य केले. दोन राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत, पण शरद पवारांची राष्ट्रवादी घड्याळाच्या राष्ट्रवादीत मर्ज होणार का? या अनुषंगाने बोलताना अजित पवारांनी भूमिका मांडली. तर, पुणे (झींपश)आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या असून अद्याप प्रचारात नेते एकत्र दिसले नाहीत. त्यामुळे, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार हे प्रचारात कधी सक्रीय होणार असा प्रश्न सर्वांनाच पडला होता. अखेर, आजपासून रोहित पवार अजित पवारांसोबत प्रचारात सक्रीय होत आहेत.





रोहित पवार आजपासून अजित पवार यांच्यासमवेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात सहभागी होणार आहेत. आज सकाळीच एबीपी माझाशी बोलताना अजित पवार यांनी लवकरच सुप्रिया सुळे, रोहित पवार, निलेश लंके पिंपरी चिंचवड पुणे महानगर पालिकेच्या प्रचारात दिसतील, असे सुतोवाच केले आहेत. त्यामुळे, रोहित पवार आज तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासोबतच घड्याळ चिन्हाचा देखील प्रचार करणार आहेत. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार भाजपवर आणि पुणे व पिंपरीतील भाजप नेत्यांवर हल्लाबोल करत आहेत. त्यामुळे, आज काका अजित पवार यांच्यासोबत रोहित पवार हेही भाजपला लक्ष्य करतील का, भाजपवर टीका करतील का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी एकत्र यायचे की नाही, याचा विचार अजून मी केलेला नाही. सध्या निवडणुकीची धामधूम सुरु आहे. त्यामुळे रोज उमेदवारांच्या निवडीपासून ते प्रचारापर्यंत खूप कामं असतात. त्यामुळे या सगळ्या गोंधळात दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येण्याबद्दल अजून मी विचार केलेला नाही. पण साधारण दोन्ही पक्षांचे खालचे कार्यकर्ते यामुळे समाधानी असल्याचे पाहायला मिळत आहे. राजकीय जीवनात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा कायमचा मित्र नसतो, एवढंच मी सांगतो. यावरून काय ओळखायचंय ते ओळखा, असे सूचक विधान अजित पवार यांनी केले.

# काँग्रेसला मत म्हणजे शांततेला मत-सतेज पाटील



**पुणे । प्रतिनिधी**

तुम्ही अशा माणसाला निवडून द्या, ज्याच्या घरी किंवा ऑफिसला तुम्हाला जाता येईल. काँग्रेसला मत म्हणजे शांततेला मत असल्याचे मत माजी गृहराज्यमंत्री व काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी केले. भाजपला मत देणे म्हणजे गुंडशाहीला मत देणे होय, अशी टीका त्यांनी भाजपवर केली. महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान प्रभाग क्रमांक २२ मधील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार उमेदवार इंदिरा अविनाश बागवे, अविनाश रमेश बागवे, रफिक शेख व दिलशाद शेख यांच्या प्रचारासाठी आज पुण्यातील हरकानगर काशेवाडी येथे जाहीर सभेचे आयोजन केले होते. त्या वेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी सफाई कामगारांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी काँग्रेस आवाज उठविणार असल्याचेही स्पष्ट केले. काशेवाडी आणि हा पूर्ण परिसर काँग्रेस पक्षाचा वर्षानुवर्षे बालेकिल्ला आहे. त्यामुळे पुण्यातील सर्वाधिक मताधिक्क्याने या प्रभागातील काँग्रेस व शिवसेना (ठाकरे) पक्षाचे उमेदवार विजय होतील, असा विश्वास माजी राज्यमंत्री रमेश बागवे यांनी व्यक्त केला. जेष्ठ नेते चंद्रकांत चव्हाण, कविराज संघेलिया, विठ्ठल थोरात, यासेर बागवे, दयानंद अडागळे, रशीद खिजर, हुसेन शेख,राजू मोरे, मोहन माने, दिलीप कांबळे व परिसरातील महिला, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवडमध्ये नवा केजीएफ

**पिंपरी । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी केजीएफ हा चित्रपट आला होता. त्यामध्ये एक गरुडा होता. त्याच्या खाणीमध्ये फक्त त्याचीच माणसं कामे करायची. या शहरात दोन गरूडा आहेत. एक दाढीवाला आणि एक बिना दाढीवाला आहे. त्यांनी या शहराला लुटून मलिदा खाल्ला असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी भाजपच्या आमदारांवर केला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सांगवी येथे जाहीर सभा घेण्यात आली. त्यावेळी रोहित पवार बोलत होते.

यावेळी पवार यांनी भोसरी आणि चिंचवड विधानसभेनुसार शहराचे तुकडे झाले असून या आमदारांनी शहराला लुटले असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, या महापालिकेमध्ये फक्त आमदारांच्या जवळच्यांनाच ठेके मिळतात. याठिकाणी नोकऱ्या मिळत नाही. तुमच्या -आमच्या मुलांना नोकऱ्या मिळण्याचा अधिकार नाही का? तुमच्या मुलांना ठेके मिळू शकत नाही. कारण त्यांना फक्त त्यांची घरे भरायची आहेत. आज शहरामध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही कारण यांना



टँकरलॉबी पोसायची आहे. त्यामधून पैसा कमवायचा आहे. काही दिवसांपूर्वी एका सोसायट्यांमधील नागरिकांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली, तर ते घरी येईपर्यंत त्यांच्या घरी गुंड पोहचले. ही दहशत मोडून काढावी लागेल.

भाजपच्या जाहीरनाम्यावर बोलत असताना ते म्हणाले, २०१७ साली भाजपाने २२ मुद्दे जाहीरनाम्यात दिले होते. त्यानुसार, तुमचा तीन लाखापर्यंत आरोग्यविमा काढला का? इस्त्रायलच्या धर्तीवर शाळा झाली का? अनधिकृत बांधकामांचा प्रश्न सोडवला का? त्यांनी मांडलेल्या २२ मुद्द्यांपैकी एकही मुद्दा त्यांना सोडवता आला नाही. तर फक्त भ्रष्टाचार केला.

# करडे-निमोणे रस्त्यावर ट्रॅक्टरची दुचाकीला धडक; ६० वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू

**न्हावरे । प्रतिनिधी**

करडे गावातून निमोणेकडे दुचाकीवरुन निघालेल्या ६० वर्षीय वृद्ध व्यक्तीला लंघेवाडी येथे दुपारच्या सुमारास भरधाव ट्रॅक्टरची जोरदार धडक बसली. त्यानंतर ट्रॅक्टर थेट अंगावरुनच गेल्याने कैलास मारुती गायकवाड (वय ६०, रा. निमोणे) यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.





अपघातानंतर गायकवाड रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन संघाचे दौलत शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू टीमने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच अत्यवस्थ अवस्थेत असलेल्या गायकवाड यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या भीषण अपघातामुळे करडे-लंघेवाडी परिसरात एकच खळबळ उडाली आहे. यावेळी घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. आपत्ती व्यवस्थापन संघाच्या रेस्क्यू टीमने मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी प्रशासनाच्या ताब्यात दिला. याप्रकरणी शिरुर पोलिस पुढील कार्यवाही करत आहेत.

# राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा स्थानिक सोसायट्यांकडे मोर्चा, प्रचारासोबत जाणून घेतल्या समस्या

**बिबवेवाडी । प्रतिनिधी**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या प्रचाराला वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रचारासोबतच विविध सोसायट्यांमधील रहिवाशांच्या समस्या जाणून घेताना दिसत आहेत. शंकर महाराज मठ-बिबवेवाडी, प्रभाग क्रमांक २० मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार गौरव घुले, प्रितम नागापुरे, अस्मिता शिंदे आणि रश्मी अमराळे यांनी विविध सोसायट्यांमध्ये प्रचार मोहीम राबवली.

या उपक्रमात भाग्यश्री सोसायटी, अनिकेत सोसायटी, पारिजात सोसायटी, विष्णु विहार सोसायटी, कुमार पार्क, झाला सोसायटी, १००८ पार्श्वनाथ जिनालय सोसायटी, निरंत कोंडोनिअम आणि अनंत वसाहत या सोसायट्यांचा समावेश होता. या सोसायट्यांमधील अंतर्गत रस्ते,



पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि सुरक्षितता अशा विविध विषयांवर प्राधान्याने लक्ष देण्याची गरज प्रतिनिधींनी व्यक्त केली. या मोहिमेत रविंद्र कांबळे, पंकज देशमुख, राजेंद्र पवार, दत्ता मुळे, महेश भागवत आणि प्रशांत गोंजारे यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादीचे उमेदवार केवळ प्रचारासाठी न येता, आपल्या समस्याही जाणून घेत असल्यामुळे रहिवाशांनी याबाबत समाधान व्यक्त केलं. यावेळी विविध प्रश्नांवर चर्चाही झाली.या दौऱ्यामुळे सोसायट्यांमधील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे प्रशासकीय कामे मार्गी लागण्यास मदत होईल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# इंद्रायणीच्या महाआरतीसाठी नगरपरिषद सहकार्य करणार : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांची ग्वाही

**आळंदी । प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीच्या पावित्र्य आणि आध्यात्मिक परंपरेला अधिक बळ देण्यासाठी आळंदी देवस्थानच्या वतीने आयोजित करण्यात येणार्या महाआरती उपक्रमास आळंदी नगरपरिषदेचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी दिली. या उपक्रमात नगरपरिषदेसह ग्रामस्थांचा सक्रिय राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आळंदी देवस्थानच्या वतीने नुकताच नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी नगराध्यक्ष कुऱ्हाडे बोलत होते. यावेळी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजनाथ, विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, डॉ. भावार्थ देखणे, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. रोहिणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नवनिर्वाचित नगरसेवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, इंद्रायणी नदी ही केवळ जलस्रोत नसून आळंदीची श्रद्धा व ओळख आहे. महाआरतीसारख्या उपक्रमातून नदी संवर्धनाबरोबरच धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांचे जतन होईल. देवस्थानच्या प्रत्येक सकारात्मक उपक्रमात नगरपरिषद भक्कमपणे उभी राहील. देवस्थानच्या पदाधिकार्यांनी नगरपरिषदेच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत, महाआरती उपक्रमामुळे भाविकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# दौंडमध्ये भीषण स्फोट! हॉटेलचे पत्रे हवेत उडाले; १० कर्मचारी आगीच्या विळख्यात,सहा जण गंभीर

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड-पाटस अष्टविनायक मार्गावरील मांढरे मळा येथील हॉटेल जगदंबामध्ये भटारखान्यातील घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरचा दुपारी स्फोट झाला. या स्फोटात हॉटेलमधील दहा कर्मचारी भाजले असून त्यापैकी सहा जण गंभीर आहेत.दौंड शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हॉटेल जगदंबामध्ये अचानक झालेल्या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. स्फोटाच्या तीव्रतेमुळे हॉटेलचे पत्रे उडून गेले.

तर दर्शनी भागातील काचेच्या खिडक्या तावदानासह खाली कोसळल्या. स्फोटात भाजलेल्या कर्मचाऱ्यांना मांढरे मळा येथील स्थानिक नागरिकांच्या मदतीने तत्काळ दौंड शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यापैकी गंभीररित्या भाजलेल्या सहा कर्मचाऱ्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच दौंड नगरपालिका तसेच कुरकुंभ एमआयडीसी अग्निशामक विभागाच्या पथकाने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविले. दरम्यान, दौंड पोलीस ठाण्याचे एक पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. आगीत भाजलेल्या दहा जणांपैकी सहा जण गंभीररित्या जखमी झाले असल्याची माहिती दौंड पोलीस ठाण्याचे निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली आहे.

**सिलंडरचा साठा बाहेर काढल्याने आगीवर नियंत्रण**

अग्निशामक कर्मचाऱ्यांनी हॉटेलमधून एकूण २१ सिलेंडर बाहेर काढले असून त्यामध्ये १४ घरगुती वापराचे व ७ वाणिज्य वापराचे सिलेंडर असल्याची माहिती देण्यात आली. मोठ्या प्रमाणात एलपीजी सिलेंडरचा साठा असतानाही वेळेवर आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला.

# मौजमजेसाठी चोरी करणारी सराईत टोळी
# पारगाव पोलिसांच्या जाळ्यात; २७ दूचाकी जप्त, १६

**आंबेगाव । प्रतिनिधी**

पारगाव (ता. आंबेगाव) : मौजमजा करण्यासाठी मोटरसायकल चोरी करणाऱ्या सराईत टोळीला पारगाव पोलिसांनी जेरबंद करत मोठी कामगिरी केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २७ मोटरसायकली हस्तगत केल्या असून एकूण १६ चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. पारगाव पोलीस ठाण्याच्या या यशस्वी कारवाईचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

पारगाव पोलिसांनी सापळा रचून रितेश फकीरा रोकडे (वय १८, रा. चांडोह, ता. शिरूर), हर्षद जालिंदर ढवळे (वय २१, रा. फाकटे, ता. शिरूर) आणि प्रथमेश दत्तात्रय ढवळे (वय १९, रा. फाकटे, ता. शिरूर) यांना अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून चोरीस गेलेल्या २७



मोटरसायकली जप्त करण्यात आल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ डिसेंबर २०२५ रोजी जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथून एक ॲक्टिव्हा स्कुटी चोरीला गेल्याची तक्रार पारगाव पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू करून सापळा रचला. तपासादरम्यान आरोपींच्या अटकेनंतर त्यांच्या चौकशीतून पुणे, अहिल्यानगर आणि जळगाव येथील पोलीस ठाण्यांतील मोटरसायकल चोरीचे गुन्हेही उघडकीस आले. ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, तसेच पोलीस अंमलदार संजय साळवे, मंगेश अभंग, चंद्रकांत गव्हाणे आणि अविनाश कालेकर यांनी या कामगिरीत मोलाचा सहभाग घेतला. दरम्यान, पारगाव पोलिसांनी गेल्या वर्षभरात मंदिरातील चोरी व मोबाईल चोरीचेही अनेक गुन्हे उघडकीस आणले आहेत. ७ ऑगस्ट २०२४ रोजी शिरूर, आंबेगाव, खेड व रांजणगाव परिसरातील मंदिरांमध्ये झालेल्या चोऱ्यांमध्ये देवाचे मुखवटे, सोन्याचे दागिने व दानपेटीतील रोकड चोरीस गेली होती. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हेगारांना अटक करून ४ लाख रुपये किमतीचा ऐवज संबंधित मंदिरांच्या ताब्यात दिला होता. तसेच २०२५ मध्ये हरवलेल्या मोबाईल प्रकरणात २५ मोबाईल फोनचा शोध लावून सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले. पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांनी यापूर्वी पुणे गुन्हे शाखेत कार्यरत असताना अनेक गुन्ह्यांची यशस्वी उकल केली असून त्यांचा गुन्हे तपासाचा आलेख सातत्याने उंचावत राहिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस पथकाने वर्षभरात मंदिर चोरी, मोबाईल चोरी आणि आता मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणून प्रभावी कामगिरी बजावली आहे.